मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : ३०४ ■ शुक्रवार, १७ जुलै २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# घारापुरीत भूमिपुत्रांच्या रोजगारावर घाला

## दंडुका मेरीटाईम बोर्डाच्या कारवाईने स्थानिक भूमिपुत्रांचा संताप अनावर

**दैनिक युवक आधार**

**प्रदिप पाटील महाराष्ट्र प्रतिनिधी :** जागतिक पर्यटनस्थळ म्हणून ओळख असलेल्या घारापुरी (एलिफंटा) बेटावर गेल्या अनेक दशकांपासून छोट्या-मोठ्या व्यवसायावर उदरनिर्वाह करणाऱ्या स्थानिक भूमिपुत्रांवर महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाने कारवाईचा बडगा उगारल्याने संतापाची लाट उसळली आहे. व्यवसाय नियमित करून भुईभाड्याने जागा द्यावी, अशी वर्षानुवर्षे मागणी करणाऱ्या व्यावसायिकांना दिलासा देण्याऐवजी लाखो रुपयांच्या दंडाच्या नोटिसा बजावत पोलिसांच्या बंदोबस्तात कारवाई करण्यात आल्याने स्थानिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

घारापुरी बेटावरील शेतबंदर जेट्टीपासून सुमारे एक किलोमीटर परिसरात महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाच्या अखत्यारीतील जागेवर स्थानिक भूमिपुत्र गेली पाच दशके चणे, फुटाणे, मका, कटलरी साहित्य, शोभेच्या वस्तू, टोप्या, स्मृतिचिन्हे आणि विविध खाद्यपदार्थांची विक्री करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. पर्यटन हाच या कुटुंबांचा एकमेव आधार असल्याने या व्यवसायावर हजारो कुटुंबांचे भविष्य अवलंबून आहे.

स्थानिक व्यावसायिकांनी अनेक वर्षांपासून संबंधित जागा नियमित करून शासनाने वाजवी भुईभाडे आकारावे, अशी मागणी सातत्याने महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाकडे केली होती. मात्र या मागणीकडे दुर्लक्ष करून कोणतीही पर्यायी व्यवस्था किंवा पुनर्वसन न करता थेट दंडात्मक



कारवाईचा मार्ग स्वीकारण्यात आल्याचा आरोप व्यावसायिकांनी केला आहे.

व्यावसायिकांच्या म्हणण्यानुसार, कोणतीही सविस्तर चर्चा, बैठक किंवा तोडगा न काढता अनेकांना जीएसटीसह लाखो रुपयांच्या दंडाच्या नोटिसा बजावण्यात आल्या. दंड न भरल्यास गाळे हटविण्याचा इशारा देण्यात आल्याने गरीब व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे दंड आकारताना एकाच प्रकारच्या गाळ्यांना वेगवेगळ्या रकमेच्या नोटिसा देण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला. काहींना तीन ते चार लाख रुपयांचा दंड तर काहींना अत्यल्प रकमेची नोटीस देण्यात आल्याने दंड आकारणीच्या निकषांबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

सध्या पावसाळ्यामुळे पर्यटन व्यवसाय मंदावलेला असताना रोजच्या कमाईवर संसार चालविणाऱ्या व्यावसायिकांकडून लाखो रुपयांचा दंड भरणे अशक्य असल्याचे त्यांनी सांगितले. एकीकडे घारापुरीला जागतिक वारसा स्थळाचा दर्जा मिळाला असून पर्यटनातून शासनाला मोठा महसूल मिळतो, तर दुसरीकडे त्या पर्यटनाची सेवा करणाऱ्या भूमिपुत्रांच्या उदरनिर्वाहाकडे मात्र दुर्लक्ष होत असल्याची खंत व्यावसायिकांनी व्यक्त केली.

कारवाईसाठी सकाळी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. त्यामुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. स्थानिक व्यावसायिक आणि महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांमध्ये यावेळी जोरदार चर्चा झाली. व्यावसायिकांनी जागा नियमित करून वाजवी दराने भुईभाडे आकारावे तसेच संबंधित गाळे ग्रामपंचायतीकडे वर्ग करण्याची मागणी केली.

काही व्यावसायिकांनी दंडाची रक्कम भरली, तर ज्यांनी रक्कम भरली नाही त्यांच्यावर अधिकाऱ्यांनी कारवाई केली. यावेळी अधिकारी आणि व्यावसायिक यांच्यात शाब्दिक वादही झाला. परिस्थिती तणावपूर्ण होताच ग्रामपंचायतीचे उपसरपंच बळीराम ठाकूर, माजी उपसरपंच सचिन म्हात्रे, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाचे अधिकारी विनायक करंजे, पोलीस अधिकारी तसेच ग्रामस्थांनी मध्यस्थी करून परिस्थिती नियंत्रणात आणली.

चर्चेदरम्यान अधिकाऱ्यांनी ज्यांना दंडाची रक्कम जास्त आकारण्यात आल्याची भावना आहे, त्यांनी आपल्या दुकानाचे छायाचित्र आणि मोजमाप सादर करावे. त्यानंतर पुन्हा मोजणी करून नियमानुसार दंड निश्चित केला जाईल, असे आश्वासन दिले.

तथापि, भूमिपुत्रांचा प्रश्न अद्याप कायम असून रोजगार हिरावून घेण्याऐवजी व्यवसाय नियमित करून कायदेशीर संरक्षण द्यावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे. घारापुरीसारख्या जागतिक पर्यटनस्थळी स्थानिक भूमिपुत्रांच्या उपजीविकेचा प्रश्न संवेदनशीलपणे हाताळण्याची गरज व्यक्त होत असून, अन्यथा या कारवाईविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही व्यावसायिकांनी दिला आहे.

# चंदुकाका सराफ बारामतीची सुवर्णपेढी, पनवेल शाखेचा पहिला वर्धापन दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**मुकुंद कांबळे सहसंपादक :** गेली तब्बल 199 वर्षांची शुद्धता, परंपरा, विश्वास, नावीन्यता आणि पारदर्शकता या पंचसूत्री मूल्यांवर भक्कमपणे उभी असलेली चंदुकाका सराफ बारामतीची सुवर्णपेढी निरंतर प्रगती करत ग्राहकांचा विश्वास संपादन करत आहे. त्याच परंपरेचा वारसा जपत चंदुकाका सराफ प्रायव्हेट लिमिटेड, पनवेल शाखेचा पहिला वर्धापन दिन शुक्रवार, दि. 10 जुलै 2026 रोजी मोठ्या उत्साहात व जल्लोषपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

यावेळी पनवेल परिसरातील मान्यवर महिला लोकप्रतिनिधींची प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांमध्ये भाजपाच्या नगरसेविका सौ. सुरेखा मोहकर, सौ. माधवी म्हात्रे, सौ. निवेदिता मोरे, सौ. साक्षी सागवेकर, सौ. प्रणिता गुल्हाने, सौ. रेश्मा कृरूप आणि सौ. पल्लवी पाटील यांचा समावेश होता.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते केक कापून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार सेल्स क्लस्टर श्री. ओमकार तिवारी,




पनवेल शाखेचे ब्रँच मॅनेजर श्री. अमेय जोशी, फ्लोअर मॅनेजर श्री. श्याम धनावडे, फ्लोअर इन्चार्ज जान्हवी इंदुलकर तसेच फ्लोअर इन्चार्ज संतोष सुतार यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

यावेळी ग्राहकांसाठी सुरू असलेल्या वर्धापन दिनाच्या विशेष ऑफर्स तसेच "अनंता मंगळसूत्र महोत्सव" या आकर्षक योजनेची सविस्तर माहिती उपस्थितांना देण्यात आली. या ऑफर्सला ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन मार्केटिंग टीम आणि पनवेल शाखेतील सर्व कर्मचारीवर्गाने एकत्रितपणे केले. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला असून उपस्थित मान्यवरांनी चंदुकाका सराफ यांच्या ग्राहकाभिमुख सेवांचे कौतुक करत पनवेल शाखेला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षणाची भक्कम पायाभरणी; शिष्यवृत्ती परीक्षेच्या विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप

## आ. प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शक, प्रश्नसंच व अभ्यास साहित्याचे वितरण





**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** "उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षणाची भक्कम पायाभरणी... प्रत्येक विद्यार्थ्याच्या यशासाठी एक छोटासा प्रयत्न!" या भावनेतून पनवेल महानगरपालिका शाळा क्रमांक २, हुतात्मा हिरवे गुरुजी शाळा (दगडी शाळा) येथील इयत्ता चौथी व सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची पुस्तके, मार्गदर्शक व प्रश्नसंचांचे वितरण भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल शहरचे सरचिटणीस अनिमेष ओझे यांच्या वतीने या शैक्षणिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेची योग्य दिशा मिळावी, दर्जेदार अभ्यास साहित्य सहज उपलब्ध व्हावे आणि अधिकाधिक विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी व्हावेत, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेसाठी उपयुक्त पुस्तके, मार्गदर्शक, प्रश्नसंच आणि आवश्यक अभ्यास साहित्य भेट देण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महापौर नितीन पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, भाजप पनवेल शहराध्यक्ष तथा नगरसेवक सुमित झुंजारराव, नगरसेवक राजू सोनी, नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, पनवेल शहर सरचिटणीस अमित ओझे, रुपेश नागवेकर, भाजयुमो शहराध्यक्ष हिमेश बहिरा, प्रभागाध्यक्ष अनिमेष पटवर्धन, हर्षल बहाडकर, आशुतोष पाटील, आकाश गाडे यांच्यासह अनेक पदाधिकारी, शिक्षक, पालक आणि मान्यवर उपस्थित होते.यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना शिक्षण हेच जीवनात यश मिळविण्याचे सर्वात प्रभावी साधन असल्याचे सांगितले. शिष्यवृत्ती परीक्षा विद्यार्थ्यांमधील गुणवत्ता, अभ्यासाची सवय आणि स्पर्धात्मक वृत्ती विकसित करणारी परीक्षा आहे. नियमित अभ्यास, वेळेचे योग्य नियोजन, सातत्यपूर्ण सराव आणि आत्मविश्वास यांच्या बळावर प्रत्येक विद्यार्थी निश्चितच यश मिळवू शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी जिद्द, मेहनत व चिकाटीने प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले.




# राजिप माजी सदस्य विलास फडके यांचा वाढदिवस विविध समाजोपयोगी कार्यक्रमानी संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** १५ जुलै रोजी विहिघर येथील रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य विलास नारायण फडके यांच्या वाढदिवसानिमित्त विहिघर आणि परिसरात विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उदघाटन शेतकरी कामगार पक्ष पनवेल महानगर जिल्हा चिटणीस नगरसेवक प्रकाश म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी क्रांतिकारी सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष नामदेवशेठ फडके तसेच महाविकास आघाडीचे अनेक नेते, कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी चिपळे ग्रामपंचायत



हद्दीतील ग्रामस्थांना मोफत आरोग्य शिबिर, औषध वाटप, नेत्रतपासणी व चष्मा वाटप तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आला. हे शिबीर विहिघर येथील रा. जि. प. शाळा हॉल येथे भरवण्यात आले. आरोग्य शिबिरामध्ये रक्तदाब, मधुमेह, थायरॉईड, ईसीजी, पीएसए, दंत तपासणी, आयुर्वेदिक तपासणी, स्त्री-पुरुष रोग तपासणी आदी सेवा मोफत देण्यात आल्या. मोतीबिंदू असलेल्या रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. नेत्रतपासणी व चष्म्यांचेही मोफत वितरण करण्यात आले. याशिवाय 'शासन आपल्या दारी' उपक्रमांतर्गत आयुष्मान योजना, आधार अपडेट, रेशन कार्ड, पॅन कार्ड, SIR फॉर्म भरणे आणि इतर शासकीय सेवा नागरिकांना मार्गदर्शन व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

सायंकाळी अभिष्टचिंतन सोहळा ठेवण्यात आला होता. यावेळी अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून विलास फडके यांच्यावरती शुभेच्छाचा वर्षाव केला. यावेळी राजकीय, सामाजिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, पत्रकार क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



मा.श्री.डॉ. भागवत कराड साहेब(माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री तथा राज्यसभा खासदार)यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा !

दैनिक युवक आधार

# गोंदिया जिल्हा काँग्रेसचे नवनियुक्त अध्यक्ष अमर वराडे यांचा आमगाव तालुका दौरा

## कार्यकर्त्यांशी संवाद साधून संघटन बळकटीकरणावर भर

**दैनिक युवक आधार**

**गोंदिया सचिन बन्सोड जिल्हा प्रतिनिधी :** गोंदिया जिल्हा काँग्रेस कमिटीचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष अमर वराडे यांनी आपला पदभार स्वीकारल्यानंतर, जनतेशी थेट संवाद साधण्यासाठी आणि पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी आमगाव तालुक्यात जनसंपर्क व कार्यकर्ता भेट दौरा आयोजित केला. या दौऱ्याच्या माध्यमातून त्यांनी तालुक्यातील विविध गावांना भेटी देऊन पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या.

**गावागावात जाऊन साधला जनसंपर्क**

या दौऱ्यात जिल्हाध्यक्ष अमर वराडे यांनी ठाणा, जांभूळटोला, अंजोरा, बोरकन्हार, आमगाव नगर परिषद क्षेत्र, शंभूटोला, कट्टीपार, घाटटेमनी, करंजी, कातुर्ली आणि सितेपार या गावांचा दौरा केला. प्रत्येक ठिकाणी त्यांनी स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी चर्चा करून पक्ष संघटनेच्या विस्ताराचा आढावा घेतला.

आमगाव नगर परिषद क्षेत्रात खासदार नामदेवराव किरसान यांच्या जनसंपर्क कार्यालयात कार्यकर्त्यांची विशेष बैठक पार पडली. या बैठकीत आगामी राजकीय घडामोडी, संघटनात्मक कार्यक्रम आणि जनतेच्या ज्वलंत प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

**'डरो मत'चा संदेश आणि काँग्रेसची ध्येयधोरणे**

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष अमर वराडे म्हणाले की, "जिल्हाध्यक्ष म्हणून माझी जबाबदारी आहे की मी लोकांपर्यंत आणि त्यांच्या समस्यांपर्यंत



पोहोचले पाहिजे. काँग्रेस कार्यकर्त्यांनी कोणाच्याही दबावाला बळी न पडता, राहुल गांधींचा 'डरो मत' हा संदेश घेऊन आत्मविश्वासाने काम करावे. जनतेमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे आणि काँग्रेसची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचवणे हेच आमचे ध्येय आहे".

**उपस्थितांची उपस्थिती**

या दौऱ्याच्या निमित्ताने काँग्रेस पदाधिकाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. यावेळी जिल्हाध्यक्ष अमर वराडे यांच्यासह प्रदेश सचिव पी. जी. कटरे, तालुकाध्यक्ष संजय बहेकार, खासदार प्रतिनिधी दुष्यंत किरसान, जिल्हा परिषद सदस्य छबूताई उके, महिला जिल्हा उपाध्यक्ष प्रभादेवी उपराडे, शहराध्यक्ष देवकांत बहेकार, परिवहन सेलचे जिल्हा अध्यक्ष बाबा मिश्रा, दिलीप टेंभरे, यादोराव भोयर, रामेश्वर श्यामकुवर, जगदीश चुटे, भोला गुप्ता, राधाकिसन चुटे, पिंकेश शेंडे, राधेलाल रहांगडाले, राहुल चुटे, तपीस परिहार, समीर खान यांच्यासह मोठ्या संख्येने काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन भोला गुप्ता यांनी केले, तर आभार प्रदर्शन शहराध्यक्ष देवकांत बहेकार यांनी केले.

# रामस्वरूप मल्टिपर्पज फाऊंडेशन तर्फे साहित्य व खाऊचे वाटप

## 'घाटले उ. प्रा. म. न. पा. मराठी शाळा क्र. १, चेंबूर' च्या माजी विद्यार्थ्यांचा उपक्रमाचा पुढाकार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल/ प्रतिनिधी :** समाजातील वंचित घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांना शिक्षणाचा हक्क मिळवून देण्यासाठी 'रामस्वरूप मल्टिपर्पज फाऊंडेशन' गेल्या ७ वर्षांपासून अविरत कार्यरत आहे. या संस्थेचे संस्थापक श्री. प्रकाश कोळी सर यांच्या 'घाटले उ. प्रा. म. न. पा. मराठी शाळा क्र. १, चेंबूर' या शाळेतील १९९०-९१ च्या ७ वीच्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा दुसरा स्नेहसंमेलन सोहळा नुकताच उत्साहात संपन्न झाला. हा सोहळा ११ जुलै २०२६ रोजी कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन संचालित 'श्री अण्णासाहेब सहस्रबुद्धे अनुदानित माध्यमिक आश्रमशाळा, वाकडी (पनवेल, जि. रायगड)' येथे पार पडला.

आदरणीय कोळी सरांच्या मार्गदर्शनाखाली आणि आश्रमशाळेच्या मुख्याध्यापिका पाटील मॅडम व त्यांच्या शिक्षकवृंदाच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. या प्रसंगी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना कोळी सरांच्या हस्ते







दैनंदिनी (डायरी) वह्या, तर माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते विविध शैक्षणिक साहित्य आणि खाऊचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला आश्रमशाळेतील शिक्षकांनी शांतीवन संस्थेच्या व शाळेच्या कार्याविषयी उपस्थितांना महत्त्वपूर्ण माहिती दिली. त्यानंतर शाळेच्या वतीने श्री. केणी सरांच्या हस्ते रामस्वरूप मल्टिपर्पज फाऊंडेशन'चे संस्थापक श्री. प्रकाश कोळी, अध्यक्षा सौ. ज्योती कोळी, ज्येष्ठ वकील खामकर साहेब, श्री. शंकर कदम, श्री. विकास बोऱ्हाडे व श्री. जय कांबळे यांचे स्वागत करण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांनी परिसरातील फुले व पानांपासून स्वतः बनवलेले पर्यावरणपूरक पुष्पगुच्छ देऊन सर्वांचे स्वागत केले.

'कोळी सर बॅच मित्र परिवारा'च्या वतीने श्री. जय कांबळे यांनी स्नेहसंमेलनाचा उद्देश स्पष्ट केला, तसेच शांतीवन संस्था व रामस्वरूप फाऊंडेशनचे आभार मानले. यानंतर श्री. विकास बोऱ्हाडे सरांनी उपस्थित विद्यार्थ्यांना, विशेषतः इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमास उद्योजक श्री देविदास जगताप, श्री लवू शिंदे, श्री कमलाकर डोळे, श्री अनिल आरेकर, श्री अंकुश कांबळे, श्री अजय कांबळे, श्री रवींद्र गुरव सौ विमल ससे, सौ प्रज्ञा बारस्कर, सौ कांचन शिंदे, सौ मिताली, सौ मंदा, सौ जयश्री चिली, सौ संगीत गायकर कु. मनीषा नागलेउपस्थित होते कार्यक्रमाच्या शेवटी आदरणीय कोळी सरांनी विद्यार्थ्यांना दैनंदिनी (डायरी) लिहिण्याचे फायदे. अभ्यासाचे अचूक नियोजन कसे करावे आणि भविष्यात यशस्वी कसे व्हावे, याविषयी अत्यंत उपयुक्त व प्रेरणादायी मार्गदर्शन केले. या उपक्रमाबद्दल सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# कल्याण शिळफाटा ते मुंब्रा बायपास महामार्गावरील अनधिकृत हॉटेल, पार्किंग व फुटपाथवरील अतिक्रमणाविरोधात भूमिपुत्र धर्माभिमानी संघटना आक्रमक

**दैनिक युवक आधार**

**कल्याण रमेश राऊत ग्रामीण प्रतिनिधी :** कल्याणफाटा ते शिळफाटा बायपासपर्यंतच्या महामार्गावर दिवसेंदिवस वाढत असलेल्या अनधिकृत हॉटेल, बेकायदेशीर गॅरेज च्या वाहन पार्किंग, फुटपाथवरील अतिक्रमणे तसेच रस्त्यावरील अडथळयांमुळे वाहतूक कोंडी, अपघातांचा धोका आणि नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.या गंभीर समस्येची दखल घेत भूमिपुत्र धर्माभिमानी संघटनेच्या वतीने ठाणे महानगरपालिका उपायुक्त तसेच दिवा प्रभाग समिती क्रमांक ६ चे सहाय्यक आयुक्त यांना निवेदन देऊन संबंधित अनधिकृत हॉटेल, पार्किंग



आणि अतिक्रमणांवर तात्काळ व कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

संघटनेने निवेदनात नमूद केले आहे की, महामार्गावरील अनधिकृत पार्किंगमुळे वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होत असून अनेकदा अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. तसेच फुटपाथवर झालेल्या अतिक्रमणामुळे पादचाऱ्यांना जीव धोक्यात घालून रस्त्यावरून चालावे लागत आहे. त्यामुळे संबंधित विभागांनी संयुक्त पाहणी करून सर्व अनधिकृत बांधकामे, पार्किंग व अतिक्रमणे तात्काळ हटवावीत आणि भविष्यात अशी बेकायदेशीर कृत्ये पुन्हा होणार नाहीत यासाठी नियमित कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

भूमिपुत्र धर्माभिमानी संघटनेने स्पष्ट इशारा दिला आहे की, प्रशासनाने या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास नागरिकांच्या हितासाठी लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रशासनाने त्वरित व प्रभावी कारवाई करावी, अशी अपेक्षा संघटनेने व्यक्त केली आहे. यावेळी संघटनेच्या वतीने श्री बाबुराव मुंडे श्री शरद पाटील श्री प्रवीण पावशे आणि श्री रवींद्र पाटील ये पदाधिकारी उपस्थित होते.

# पाऊस झाला गायब, गेल्या पाच ते सहा दिवसांपासून पावसाचा पत्ता नाही

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** गेल्या पाच ते सहा दिवसांपासून पाऊस पडत नसल्याने पाऊस गायब झाला असल्याची चर्चा सर्वत्र सुरू आहे. त्यामुळे सर्वच पावसाची आतुरतेने वाट पाहत आहेत. पनवेल तालुक्यात आत्तापर्यंत १ हजार ७३० मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. तालुक्यात दरवर्षी साडेतीन ते चार हजार मिलिमीटर पाऊस पडतो. त्यामुळे 40 ते 45% पनवेलमध्ये पाऊस झाला आहे. मागील आठवड्यात जोरदार पावसाला सुरुवात झाली आणि सहा दिवसात तब्बल 1000 मिलिमीटर पावसाची नोंद पनवेलमध्ये झाली. मात्र त्यानंतर पाऊस रुसून बसला. गेल्या पाच ते सहा दिवसांपासून पावसाचा पत्ता नाही. त्यामुळे नदीला आलेला पूर देखील ओसरला आहे तसेच शेतामध्ये साचलेले पाणी देखील आटले. शेतकऱ्यांनी पेरलेल्या बीयाणे रोपांसाठी सध्या पावसाच्या पाण्याची आवश्यकता आहे मात्र पाऊस पडत नसल्याने शेतकरी हवालदिल झालेला आहे.

जुलै महिन्याच्या पहिल्या आणि दुसऱ्या आठवड्यात पावसाने पनवेलकरांना चांगलेच झोडपून काढले. या मुसळधार पावसामुळे अनेकांचे नुकसान झाले. सध्या सकाळपासून ढगाळ वातावरण असले तरी पावसाच्या सरी कोसळत नाहीत. उलट उकाडा आणि दमट हवामानामुळे नागरिक हैराण झाले आहेत. काही भागांतील शेतकऱ्यांनीही पावसाच्या खंडामुळे चिंता व्यक्त केली असून पिकांना पुन्हा पावसाची गरज असल्याचे सांगितले आहे. गेल्या पाच ते सहा दिवसांपासून परिसरात पावसाने दडी मारली आहे.

# पीएफ अंशदान भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (प्रतिनिधी) :** इंडसइंड बँकेने केंद्रीय कामगार व रोजगार मंत्रालयाच्या अखत्यारीतील कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना (ईपीएफओ) सोबत यशस्वी एकत्रीकरण (इंटिग्रेशन) केल्याची घोषणा केली आहे. या एकत्रीकरणामुळे नियोक्ते आणि संस्थांसाठी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (पीएफ) अंशदान भरण्याची प्रक्रिया अधिक सोपी, जलद आणि सुरक्षित झाली आहे.या सुविधेमुळे नियोक्ते आणि संस्था ईपीएफओ पोर्टलवर इंडसइंड बँकेची निवड करून बँकेच्या कॉर्पोरेट इंटरनेट बँकिंग तसेच 'इंडी फॉर बिझनेस' (एमएसएमई) डिजिटल बँकिंग प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून सहजपणे पीएफ अंशदान भरू शकतील. याशिवाय, 'इंडस डायरेक्ट' मोबाईल बँकिंग ॲपद्वारेही ही सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या एकत्रीकरणामुळे इंडसइंड बँकेचे ग्राहक ईपीएफओ पोर्टलवरून थेट आणि सुरक्षित पद्धतीने पीएफ अंशदान जमा करू शकतील. त्यामुळे व्यवहार अधिक सुलभ होण्याबरोबरच उद्योग, कंपन्या आणि विविध संस्थांना त्यांच्या वैधानिक जबाबदाऱ्या वेळेत आणि कार्यक्षमतेने पूर्ण करणे शक्य होणार आहे. देशातील महत्त्वाच्या वैधानिक देयकांपैकी एक असलेल्या ईपीएफ अंशदान प्रक्रियेला इंडसइंड बँकेच्या डिजिटल बँकिंग प्रणालीशी जोडणारे हे एक महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे बँकेने म्हटले आहे. या उपक्रमामुळे व्यवसाय आणि संस्थांसाठी विश्वासार्ह बँकिंग भागीदार म्हणून इंडसइंड बँकेचे स्थान अधिक बळकट होणार असल्याचा विश्वास बँकेने व्यक्त केला आहे.

# अंबुजा सिमेंटने एका मजूर उद्योजकाच्या वाटचालीला दिले बळ

## सन्मान प्रणीत उपक्रमाच्या माध्यमातून कंत्राटदारांच्या प्रगतीला सातत्याने अंबुजा सिमेंट पाठबळ देते

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी :** अदानी सिमेंट आणि बांधकाम साहित्य क्षेत्रातील कंपनी अंबुजा सिमेंट्स दर्जेदार उत्पादने, विश्वासार्ह भागीदारी आणि सन्मान प्रणीत उपक्रमांच्या माध्यमातून कंत्राटदारांच्या प्रगतीला सातत्याने पाठबळ देत आहे. मुंबईतील कंत्राटदार सुरेंदर चौहान यांचा प्रवास चिकाटी, कठोर परिश्रम आणि गुणवत्तेबाबतची बांधिलकी यांच्या बळावर बांधकाम क्षेत्रात यशस्वी कारकीर्द कशी घडवता येते याचे प्रेरणादायी उदाहरण आहे.

adani
Cement

10 वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर सुरेंदर अधिक चांगल्या संधी आणि स्थिर भविष्यासाठी मुंबईत आले. त्यांनी बांधकामाच्या ठिकाणी मजूर आणि गवंडी म्हणून काम करायला सुरुवात केली. या काळात त्यांनी बांधकाम तंत्र, कारागिरी आणि बांधकाम स्थळावरील कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव मिळवला. कौशल्य आणि आत्मविश्वास वाढत गेल्यानंतर सुरेंदर यांनी स्वतंत्रपणे छोटे बांधकाम प्रकल्प स्वीकारण्यास सुरुवात केली. सातत्यपूर्ण प्रयत्न, दर्जेदार काम आणि ग्राहकांशी दृढ संबंध यांच्या बळावर त्यांनी हळूहळू स्वतःची चौहान कन्स्ट्रक्शन ही कंपनी स्थापन केली आणि बांधकाम क्षेत्रातील आपला विस्तार वाढवला.

आज चौहान कन्स्ट्रक्शन हे स्थानिक बांधकाम क्षेत्रात एक आदराने घेतले जाणारे नाव बनले आहे. मजूर आणि गवंडी म्हणून काम सुरू करून स्वतःची बांधकाम कंपनी स्थापन करणाऱ्या सुरेंदर यांचा प्रवास समर्पण आणि आत्मविश्वासाच्या जोरावर यशस्वी कारकीर्द घडवू इच्छिणाऱ्या अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. सामान्य परिस्थितीतून सुरुवात करून बांधकाम क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या सुरेंदर यांच्या यशोगाथेतून चिकाटी, उत्कृष्ट कारागिरी आणि दीर्घकालीन बांधिलकी यांच्या माध्यमातून कंत्राटदारांच्या प्रगतीला कशी चालना मिळू शकते हे अधोरेखित होते.

# जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड यांची सदिच्छा भेट

## ग्राहक संरक्षण चळवळ जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यावर चर्चा

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम :** जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर येथे जिल्हा पुरवठा अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी व्यंकटेश रावलोड यांची सदिच्छा भेट घेऊन जिल्ह्यातील वितरण व्यवस्था तसेच ग्राहक संरक्षण चळवळीच्या विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

समाजातील शेवटच्या घटकापर्यंत ग्राहक संरक्षण चळवळ प्रभावीपणे पोहोच




विण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत यावेळी विचारविनिमय करण्यात आला. सध्याच्या परिस्थितीत ग्राहकांना त्यांच्या हक्कांबाबत जागरूक करणे आणि ग्राहक संरक्षण चळवळीला अधिक व्यापक स्वरूप देण्याची गरज असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.


यावेळी प्रांत ग्राहक संरक्षण परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश भोसले, प्राचार्य डॉ. रामलिंग मुळे, जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे सचिव सूरज रामलिंग मुळे, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुभाष घोडके, ग्राहक संरक्षण परिषदेच्या लीगल सेलचे जिल्हाध्यक्ष राम पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी प्रांत ग्राहक संरक्षण परिषदेचे राज्य मार्गदर्शक तथा जवळगा येथील माजी सरपंच प्राचार्य डॉ. रामलिंग मुळे यांच्या हस्ते 'रामलिंगेश्वराचा ज्ञानयात्री' या गौरवग्रंथासह शाल व पुष्पगुच्छ देऊन जिल्हा पुरवठा अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी व्यंकटेश रावलोड यांचा सत्कार करण्यात आला.

# प्रात्यक्षिक प्रशिक्षणातून विद्यार्थी स्वावलंबी बनतील; देशाच्या आर्थिक विकासात मोलाचे योगदान देतील – लोकनेते रामशेठ ठाकूर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी) :** प्रात्यक्षिक प्रशिक्षण, उद्योगाभिमुख शिक्षण आणि दर्जेदार अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थी स्वतःच्या पायावर उभे राहतील तसेच देशाच्या आर्थिक विकासातही महत्त्वपूर्ण योगदान देतील, असा विश्वास रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केला. कामोठे येथे रयत शिक्षण संस्थेच्या इन्स्टिट्यूट ऑफ प्रोफेशनल एक्सलन्सच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

बदलत्या आधुनिक अर्थव्यवस्थेच्या गरजा लक्षात घेऊन आणि उद्योगाभिमुख व्यावसायिक शिक्षणाद्वारे तरुणांना सक्षम करण्याच्या उद्देशाने रयत शिक्षण संस्थेने कामोठे येथे इन्स्टिट्यूट ऑफ प्रोफेशनल एक्सलन्सची स्थापना केली आहे. येत्या ऑगस्ट २०२६ पासून येथे विविध कौशल्य विकास अभ्यासक्रम सुरू होणार असून, विद्यार्थ्यांना जागतिक रोजगाराच्या



संधींसाठी सक्षम बनविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

या संस्थेमध्ये लॉजिस्टिक्स अँड सप्लाय चेन मॅनेजमेंट, बँकिंग, फायनान्शियल सर्व्हिसेस अँड इन्शुरन्स (BFSI), परदेशी भाषा तसेच रिटेल मॅनेजमेंट यांसारख्या उच्च रोजगारक्षम क्षेत्रांतील अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सातारा येथील रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन मा. चंद्रकांत दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प साकार झाला असून, विद्यार्थ्यांना अत्याधुनिक पायाभूत सुविधा, आधुनिक प्रयोगशाळा आणि अनुभवी तज्ज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन मिळणार आहे.

संस्थेचे उद्घाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. शुभदा नायक यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून संस्थेच्या स्थापनेमागील उद्दिष्टे, ध्येय आणि भविष्यातील वाटचालीची माहिती दिली.

यावेळी युएसडीसी टेक्नॉलॉजीचे संचालक हुसेन हाजिते, महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, रायगड विभागाचे विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे, लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, कामोठेच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे तसेच लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे प्राचार्य अविनाश कुलकर्णी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमास शिक्षणक्षेत्रातील मान्यवर, विद्यार्थी, पालक आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# नवीन रेल्वे पुलानंतर फुटपाथवर वाढले अनधिकृत दुचाकी पार्किंग; कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**नवी पनवेल/ प्रतिनिधी :** अभ्युदय बँकेजवळ नवीन रेल्वे पूल सुरू झाल्यापासून नीलकंठ सोसायटी परिसरातील फुटपाथवर बाहेरून येणाऱ्या नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात दुचाकी पार्किंग केली जात असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी केली आहे. त्यामुळे संध्याकाळच्या वेळेत वाहतूक कोंडी निर्माण होत असून स्थानिक रहिवाशांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

याचबरोबर रस्त्याच्या कडेलाही मोठ्या प्रमाणात वाहन पार्किंग होत असल्याने वाहतुकीवर अतिरिक्त ताण निर्माण होत आहे. तसेच सेक्टर 18 मधील रोड क्रमांक 3 वरील फुटपाथवरही अनधिकृत पार्किंग सुरू झाल्याने पादचाऱ्यांना चालण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध राहत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.वाहतूक पोलिसांनी टोविंग वॅन व मनुष्य बळ पुरवण्याची मागणी महापालिके कडे केली आहे तसेच जनतेनी महानगरपालिकेला त्या ठिकाणी नो पार्किंग बोर्ड लावण्याची मागणी केली आहे.

ही समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून भविष्यात आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष घालून फुटपाथवरील अनधिकृत पार्किंग हटवावे, वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी




आवश्यक उपाययोजना कराव्यात आणि नागरिकांना सुरक्षितपणे पायी चालता येईल यासाठी कायमस्वरूपी तोडगा काढावा,पार्किंग व्यवस्था करा अशी मागणी करण्यात आली आहे.

ही मागणी आदित्य जानोरकर, सचिव, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस युवक (शरदचंद्र पवार पक्ष) यांनी संबंधित प्रशासनाकडे केली आहे.

# नगराज शेठसीबीएसई इंटरनॅशनल स्कूल उरणमध्ये नेत्रचिकित्सा शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** उरण मधील साई ट्रस्ट संचालित नगराजशेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूल मध्ये गेल्या काही दिवसात सुरु असलेल्या वादळी हवामान व मुसळधार पाऊस यामुळे स्थगित करण्यात आलेला डॉक्टरदिन व त्यानिमित्ताने आयोजित नेत्रचिकित्सा शिबीर दि.14 जुलै रोजी आयोजित करण्यात आले.

या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणूनसाई ट्रस्टच्या सदस्या सौ.सोनाली पाटील मॅडम, इंदिरा ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.बाबासो कलेल. डॉ.सत्या ठाकरेआणि नेक्सव्हिजन च्या प्रशासकीय अधिकारी डॉ.स्वाती जोरकर,नेत्रतज्ञ मनताषा पटेल आणि स्कूलचे प्रशासकीय अधिकारी प्रदीप पाटील सर,प्रिन्सिपॉल ज्योती म्हात्रे मॅडम,सर्व शिक्षक वृंद,शिक्षकेतर कर्मचारीवर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. प्रथेप्रमाणे मान्यवरांच्या हस्ते श्रीगणेश. श्री सरस्वतीमाता व श्री साईनाथयांच्या मूर्तीस पुष्पहार घालूनव दीपप्रज्वलित




करून शिबिराचा शुभारंभ करण्यात आला.या प्रसंगीडॉ.बाबासो कलेल यांनी नगराज शेठसीबीएसई इंटरनॅशनल स्कूलमध्ये नेहमी वेगवेगळे कार्यक्रम साजरे करण्यात येतात याचा उहापोह करून विध्यार्थ्यांच्या बाल मनावरअभ्यासाबरोबर संस्कार शिकविले जातात ही या विद्यालयाची जमेची बाजू असल्याचे ते म्हणाले साईट्रस्टचे अध्यक्ष नरसू पाटील सर हे स्वतः शिक्षक असल्यानेत्यांचे मुलांच्या गुणवत्ते बरोबर त्यांच्या सुप्त गुणांचा ही विकास व्हावा ही त्यांची मूळ संकल्पना असल्याचे त्यांनी यावेळी सांगीतले विध्यार्थ्यांनी स्वताच्या अभ्यासाकडे लक्षद्यावे मोबाईल पाहण्याचे प्रमाण कमी करावे विद्यालयाचे प्रशासक प्रदीप पाटील आणि प्रिन्सिपॉल ज्योती म्हात्रे मॅडम या जातीने लक्ष घालून त्यांच्या सहकार्यांच्या सहकार्याने विध्याल्याची प्रगती साधत आहेत ही कौतुकास्पद बाब असल्याचे ते शेवटी म्हणाले. तर या प्रसंगी उपस्थित डॉ.स्त्या ठाकरे यानी विध्यार्थ्यांनी स्वच्छते बाबत काळजी कशी घ्यावी या बाबत मार्गदर्शन करून कुणीही जंग फूडखाऊ नये एनर्जी ड्रिंक पिऊ नये घरात आईने बनविलेले जेवण अथवा खाऊ किंवा नाश्ता करावा उघड्यावरचे खाद्यपदार्थ खाऊ नयेत मैदानी खेळ खेळावे मात्र मोबाईल पासून दूर राहावे नाहीतर जाड भिंगाचा चष्मावापरण्याची वेळयेईल आणि नाईलाजाने इंजेक्शन टोचावे लागेल ज्याला तुम्ही सर्वजण घाबरता आज नेक्सव्हिजन वतीने तुमच्या डोळ्याचे आरोग्य कीतपत चांगले आहे समजेल या साठी येथे उपस्थित डॉ.साक्षी मॅडम आणि नेत्रतज्ञ मनताषा पटेल या तुम्हाल मार्गदर्शन करतील असे संगितले शेवटी नेक्सव्हिजनच्या प्रशासकीय अधिकारी डॉ.स्वाती जोरकर मॅडमयांनी डोळ्यांची निगा कशी ठवावी याबदल सविस्तरपणे माहिती दिली.शेवटी संपन्न झालेल्या नेत्रचिकित्सा शिबिर अंतर्गत सुमारे 93 पेक्षा अधिक विद्यार्थांनीया शिबिराचा लाभ घेतला.


# लोकायुक्तांकडून पाली-देवद-सुकापूर पुनर्विकास तक्रारीची दखल

**दैनिक युवक आधार**

**पनवेल दिपक कोळवणकर , प्रतिनिधी :** पाली, देवद, सुकापूर (ता. पनवेल, जि. रायगड) येथील फेडरेशनच्या पुनर्विकास प्रस्तावासंदर्भात करण्यात आलेल्या तक्रारीची महाराष्ट्र राज्य लोकायुक्त कार्यालयाने अधिकृत दखल घेतली आहे. याबाबतचे स्वीकारपत्र (Acknowledgement) लोकायुक्त कार्यालयाकडून जारी करण्यात आले आहे.

मागील चार वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पुनर्विकास प्रस्तावासंदर्भात रहिवाशांच्या वतीने शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. या प्रकरणी संबंधित कागदपत्रांसह लोकायुक्तांकडे तक्रार दाखल करण्यात आली होती.

लोकायुक्त कार्यालयाने पाठविलेल्या


लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय
नवीन प्रशासन भवन,
१ ला मजला, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.
ई-मेल आयडी : soadm.lokayukta@maharashtra.gov.in

Acknowledgement

क्र. उलोआ/कॉम/२२३१/२०२६ (टे-१७) 13965/2026
15 JUL 2026

प्रति,
श्री. दिपक विष्णू कोळवणकर,
रा. पाली देवद सुकापूर को. ऑप. हौ. सोसायटी,
ई-मेल : deepakkolwankar324@gmail.com

महोदय,
आपली दिनांक ०७/०४/२०२६ ची तक्रार उलोआ/कॉम/२२३१/२०२६ (टे-१७) या क्रमांकाखाली नोंदविण्यात आली आहे. सदर तक्रारीसंदर्भात पत्रव्यवहार करताना पुढील प्रत्येक पत्रात या क्रमांकाचा उल्लेख आवर्जून करावा.

सदर तक्रारीची महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ व त्याखालील काढलेले महाराष्ट्र लोक आयुक्त व उप लोक आयुक्त नियम, १९७४ अंतर्गत छाननी करण्यात येत आहे. तरी, त्याबाबत करण्यात येणाऱ्या पुढील कार्यवाहीबाबत आपणास यथावकाश कळविण्यात येईल.

आपला विश्वासु,
(नि. ह. धुरी)
कक्ष अधिकारी

पत्रानुसार, सदर तक्रारीची अधिकृत नोंद करण्यात आली असून, महाराष्ट्र लोकायुक्त व उपलोकायुक्त अधिनियम तसेच संबंधित नियमांनुसार तक्रारीवर पुढील कार्यवाही

## तक्रार स्वीकारल्याचे अधिकृत पत्र; पुढील कार्यवाहीची माहिती योग्य वेळी देणार

करण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच पुढील पत्रव्यवहार करताना तक्रार क्रमांकाचा उल्लेख करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

याबाबत प्रतिक्रिया देताना दिपक कोळवणकर यांनी सांगितले की, "लोकायुक्त कार्यालयाने तक्रारीची दखल घेतल्यामुळे रहिवाशांना न्याय मिळेल, अशी अपेक्षा आहे. पुढील कार्यवाहीबाबतची माहिती मिळाल्यानंतर ती सर्व रहिवाशांना कळविण्यात येईल."

# समाजसेवेतील उल्लेखनीय कार्याची दखल; कोमल मोहनिश भोईर यांना मानद डॉक्टरेट सन्मान

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** समाजातील गरजू, वंचित आणि दुर्बल घटकांच्या सेवेसाठी सातत्याने कार्य करणाऱ्या कोमल मोहनिश भोईर यांना सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत "व्हिजनरी डॉक्टरेट ऑनर इन सोशल वर्क" हा प्रतिष्ठेचा मानद डॉक्टरेट सन्मान प्रदान करण्यात आला.

विविध सामाजिक उपक्रमांद्वारे मानवतेची सेवा, समाजाप्रती असलेली निष्ठा आणि लोककल्याणासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची नोंद घेऊन हा सन्मान बहाल करण्यात आला आहे.

कोमल मोहनिश भोईर यांनी अनेक वर्षांपासून गरजू कुटुंबांना मदतीचा हात देणे, पूरग्रस्तांना मदत, दिव्यांगांना व्हीलचेअर वाटप, आर्थिकदृष्ट्या दुर्बल मुलांना शैक्षणिक सहाय्य, महिलांसाठी आरोग्य जनजागृती उपक्रम तसेच



वृद्धाश्रमांमध्ये सेवा अशा विविध सामाजिक कार्यातून समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

त्यांच्या सेवाभावी वृत्तीमुळे अनेक गरजूंच्या जीवनात सकारात्मक बदल घडून आले असून, समाजहितासाठी केलेल्या या सातत्यपूर्ण कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेत त्यांना हा मानाचा सन्मान प्रदान करण्यात आला आहे.

या सन्मानाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना कोमल मोहनिश भोईर म्हणाल्या, "हा सन्मान माझ्यासाठी अभिमानाचा क्षण असून समाजासाठी अधिक जबाबदारीने आणि निःस्वार्थ भावनेने कार्य करण्याची प्रेरणा देणारा आहे.

प्रत्येक गरजू व्यक्तीपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याचा माझा प्रयत्न यापुढेही कायम राहील."

त्यांच्या या यशाबद्दल विविध सामाजिक, शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

"समाजसेवा हीच खरी मानवसेवा" या विचाराने प्रेरित होऊन कोमल मोहनिश भोईर यांचे कार्य भविष्यातही अधिक व्यापक स्वरूपात सुरू राहणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# सामान्य माणसाला न्याय देणे! हीच खरी लोकसेवा आहे!" - पोलीस महासंचालक डॉ.महेश भागवत

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा शेख महेशर ताहेर (प्रतिनिधी)** - भावी प्रशासकीय आधिकाऱ्यांनो भविष्यात कोणत्याही दबावाला बळी न पडता सामान्य माणसाला न्याय द्या, हीच खरी लोकसेवा आहे! असे प्रतिपादन महाराष्ट्रातील भूमीपुत्र तथा तेलंगणा राज्याचे पोलीस महासंचालक डॉ.महेश मुरलीधर भागवत (IPS)यांनी केले. ते विद्येचे माहेर घर समजल्या जाणाऱ्या पुणे येथे हिरकणी सामाजिक प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य आयोजित ७ व्या महाराष्ट्रातील केंद्रीय लोकसेवा आयोग(UPSC)-२०२५ परीक्षेमधील यश संपादन केलेल्या ११५ गुणवंताच्या गुण गौरव सोहळ्याच्या अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की तुम्ही प्रशासकीय "अधिकारी झाल्यानंतर प्रामाणिकपणे, इमानदारीने व प्रभावीपणे काम करा! हा गुणगौरव सोहळा गेल्या ७ वर्षापासुन महाराष्ट्रात हिरकणी सामाजिक प्रतिष्ठान (पारगाव घुमरा, ता.पाटोदा जि.बीड) संचलित महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष ॲड.तात्यासाहेब घुमरे (पवार) यांच्या कल्पकतेतुन हा सुतत्य उपक्रम अविरतपणे राबवला जातो. या वर्षीच्या या गुण गौरव सोहळयात सहभागी ११५ (UPSC) यशवंत भूमीपुत्रांचा गुण गौरव करण्यात आला. या यशवंतांच्या गुण गौरव सोहळ्यासाठी खास तेलंगणा राज्याचे पोलीस महासंचालक महेश भागवत (IPS) यांची विशेष उपस्थिती होती. हा गुण गौरव सोहळा कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे येथील भव्य शिरनामे सांस्कृतिक सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन तेलंगणा राज्याचे पोलीस महासंचालक डॉ.महेश मुरलीधर भागवत (IPS) यांच्या हस्ते झाले. प्रारंभी अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या शुभ हस्ते दिपप्रज्वलन करून महापुरुषाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. वंदेमातरम् व महाराष्ट्र गीताचे सामुहिक गायन करण्यात आले. प्रारंभी या गुणगौरव सोहळयाचे प्रास्ताविक हिरकणी सामाजिक प्रतिष्ठान (पारगाव घुमरा ता.पाटोदा जि.बीड) महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष ॲड.तात्यासाहेब आबासाहेब घुमरे (पवार) (विधीज्ञ उच्च न्यायालय खंडपीठ छ.संभाजीनगर) यांनी केले. आपल्या प्रस्ताविकात त्यांनी सांगितले की हिरकणी सामाजिक प्रतिष्ठान हे अनेक सामाजिक लोक उपयुक्त उपक्रम राबवते. गेली ७ वर्षापासून हा गुण गौरव सोहळा आयोजित केला जातो. या मागील उद्देश हा आहे की महाराष्ट्राच्या मातीतील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना(UP-SC) सारख्या कठीण समजल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षांचे योग्य मार्गदर्शन मिळावे! व याची प्रेरणा घेऊन महाराष्ट्रातील होतकरू विद्यार्थ्यांना उपयोग व्हावा! या हेतुनेच हा गुण गौरव सोहळा आयोजित केला जातो. व यातुन ग्राणीण भागातील होतकरु विद्यार्थ्यांना यशस्वी अधिकाऱ्या बरोबर प्रत्यक्ष संवाद साधण्याची संधी मिळावी आणि कर्तृत्ववान यशवंतांच्या प्रेरणेतून ग्रामीण युवक-युवतींना मोठी स्वप्ने पाहण्याची उमेद मिळावी व ग्रामीण भागातील विद्यार्थी UPSC सारख्या कठीण परिक्षेत उतरावा या उद्देशाने हा उपक्रम सुरू केला असल्याचे त्यांनी सांगितले. जनतेप्रती उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि निःपक्षपातीपणा जपत कार्य करण्याचे त्यांनी भावी प्रशासकीय आधिकाऱ्यांना शेवटी भावनिक आवाहन केले. या वेळी व्यासपीठावर प्रमुख उपस्थित असलेले मा.श्री सुनील लिमये (IFS), (CEC) (मेंबर, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली) यांनी ही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना,"प्रशासकीय अधिकारी म्हणून यशस्वी होण्याबरोबरच एक संवेदनशील माणूस म्हणून समाजातील गरजूंच्या कामी येणे, हीच खरी प्रशासकीय सेवेची ओळख आहे," असे सांगत प्रामाणिकपणा, सेवाभाव आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचे आवाहन केले. तसेच डॉ.दिपक रिपोटे (IRS), (इनकम टॅक्स ट्रिब्युनल, पुणे) डॉ.प्रा.सुभाष भालेकर, (सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य,कृषी महाविद्यालय, पुणे), प्राचार्य डॉ.विश्वनाथ कदम (श्री.शिवाजीराव पंडित महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी ता.गेवराई जि.बीड) यांनी ही उपस्थित राहून योग्य मार्गदर्शन केले. यशस्वी गुणवंताचे अभिनंदन! करुन त्यांच्या

## पुणे येथे हिरकणी सामाजिक प्रतिष्ठान आयोजित युपीएससी(UP-SC) परीक्षेतील गुणवंतांचा गुणगौरव सोहळा संपन्न बीडचे भूमीपुत्र ॲड.तात्यासाहेब घुमरे यांचा पुणे येथे सुतत्य उपक्रम...

भविष्यातील उज्ज्ल कार्यासाठी शुभेच्छा! दिल्या. अध्यक्षीय समारोप करताना तेलंगणाचे पोलीस महासंचालक डॉ.महेश मुरलीधर भागवत (IPS) यांनी हिरकणी सामाजिक प्रतिष्ठानच्या कार्याचे विशेष कौतुक करताना सांगितले की, "हिरकणी सामाजिक प्रतिष्ठानने हाती घेतलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून यूपीएससीची तयारी करणाऱ्या आणि यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठी प्रेरणा मिळेल. विशेषतःॲड. तात्यासाहेब घुमरे (पवार) यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेला हा उपक्रम अनेक होतकरू युवक-युवतींच्या आयुष्याला नवी दिशा देणारा ठरेल, असा अशावाद व्यक्त केला. या नंतर महाराष्ट्रातील विविध भागांतून UPSC परीक्षा- २०२५ मध्ये यश संपादन केलेल्या ११५ यशवंतांचा हिरकणी सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड.तात्यासाहेब आबासाहेब घुमरे (पवार) व डॉ.महेश भागवत व मान्यवरांच्या शुभ हस्ते ११५ गुणवंताचा सन्मानचिन्हे, शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमास माजी मुख्य कार्यकारी अधिकारी मा.अशोक कोल्हे, नगरसेवक बालाजी जाधव, कल्याणराव तावरे (उद्योजक पुणे), उद्धव नेटके (कृषी अधिकारी) व पारगांव घुमरा येथील बहुसंख्य नागरिक यांच्या सह हिरकणी सामाजिक प्रतिष्ठानचे ॲड.योग पाटील, अभियंता धीरज घुमरे (पवार), कबीर घुमरे, रंजित देशमुख, इंजि.शुभम डरपे, विराज कापसे, शुभम कावळे, नितीन जाधव, रवी (प्रेम) चव्हाण, नितीन बागवाले, सचिन भोले, ॲड.सचिन भगवान जावळे, संभाजी सरवदे, गुरूमित इकबालसिंग गिल, बाबा शिंदे, याची उपस्थिती होती. हिरकणी सामाजिक प्रतिष्ठानच्या सर्व पदाधिकाऱ्यानी कार्यक्रमाच्या नियोजनापासून अंमलबजावणी पर्यंत अथक परिश्रम घेत कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. या सर्व यशस्वी भावी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी मनोगत व्यक्त करतांना अभ्यास कसा करावा हे सांगितले. नियोजनपूर्वक अथक परिश्रम घेऊन अभ्यास केल्यास यश नक्की मिळतेच! असे सांगितले. याची प्रेरणा महाराष्ट्रातील युपीएससी परीक्षेची पूर्व तयारी करणाऱ्या उपस्थित हजारो विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली! मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील ग्रामिण भागातील एका भूमीपुत्रांनी विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे नगरीत हा भव्य दिव्य गुण गौरव सोहळा आयोजित केला, हे काम कौतुकास पात्र आहे. या भव्य व दिमाखदार गुण गौरव सोहळ्याचे बहारदार सुत्रसंचलन पाटोदा येथील जयभवानी महाविद्यालयातील मराठी विषयाचे गाढे अभ्यासक, विद्यार्थीप्रिय प्रा. डॉ.अशोक देवगुडे यांनी केले. तर उपस्थित मान्यवर, गुणवंत अधिकारी व उपस्थित विद्यार्थ्यांचे व सर्व उपस्थितांचे आभार हिरकणी सामाजिक प्रतिष्ठानचे अभियंता मा.धिरज घुमरे (पवार) व कृषी महाविद्यालय शिवाजीनगर पुणे येथील विद्यार्थीनी कु.विभावरी वाघचौरे यांनी व्यक्त केले. या गुण गौरव सोहळ्याचे सुंदर छायाचित्रण श्री.विलास वीर यानी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ॲड.तात्यासाहेब घुमरे (पवार ) व सहयोगी अधिष्ठता तथा प्राचार्य डॉ.सुभाष भालेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हिरकणी सामाजिक प्रतिष्ठनच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले. कृषी महाविद्यालय शिवाजीनगर पुणे च्या वतीने सर्व उपस्थितांना अतिशय उत्तम भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. शेवटी राष्ट्रगीताने या गुण गौरव सोहळ्याची सांगता करण्यात आली.

# सणसर ग्रामस्थांकडून शिवाजीराव निंबाळकर व मेघराज राजे भोसले यांचा नागरी सत्कार

**दैनिक युवक आधार**

**सणसर विकास क्षत्रिय :** श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या व्हाईस चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल शिवाजीराव (दादा) रामराव निंबाळकर तसेच अखिल भारतीय चित्रपट महामंडळाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल मेघराज राजे भोसले यांचा सणसर ग्रामस्थांच्या वतीने उत्साहात नागरी सत्कार करण्यात आला. सणसरच्या सुपुत्रांनी विविध क्षेत्रांत मिळविलेल्या या यशाचा ग्रामस्थांनी अभिमान व्यक्त करत त्यांचा गौरव केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन पृथ्वीराज (बापू) जाचक होते.यावेळी कारखान्याचे संचालक रामचंद्र निंबाळकर,माजी संचालक विजयसिंह निंबाळकर, शीलाकाकी निंबाळकर, संभाजीराव निंबाळकर,सरपंच यशवंत पाटील,माजी सरपंच विजय पाटील,सणसर विविध कार्यकारी सेवा सहकारी



सोसायटीच्या अध्यक्षा सीमावहिनी निंबाळकर माजी चेअरमन विक्रमभैय्या निंबाळकर शब्बीरभाई काझी,रमेश नाना निंबाळकर माजी उपसरपंच यजूवेंद्र निंबाळकर सोसायटीचे संचालक जगदीश सोनार पोलीस पाटील राजेंद्र चव्हाण सागर भोईटे,वसंतराव जगताप दत्ता पाटील अमोल सर निंबाळकर सागर पाटील,हनीफभाई तांबोळी इकबाल सय्यद मुबारक सय्यद,शंभूराजे निंबाळकर ग्रामसेवक सचिन पवार, जाचकवस्तीच्या सरपंच सौ.सोनाली निंबाळकर,माजी उपसरपंच दिपक निंबाळकर,तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष महेश निंबाळकर चंद्रशेखर निंबाळकर सर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी शिवाजीराव निंबाळकर आणि मेघराज राजे भोसले यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच सणसर गावातील विविध व्यक्तींची विविध संस्था व पदांवर निवड झाल्याबद्दल त्यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सत्कारमूर्तींच्या परिचयाची माहिती अभिजित सर निंबाळकर यांनी सविस्तर मांडण्यात आली तर आभार तानाजी निंबाळकर यांनी मानले.

# SIR मोहिमेला १० दिवसांची मुदतवाढ?

**मुंबई :** राज्यातील मतदार यादी अधिक अचूक आणि अद्ययावत करण्यासाठी सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) मोहिमेला १० दिवसांची मुदतवाढ मिळण्याची शक्यता आहे. मुसळधार पाऊस, नागरिकांची वाढती गर्दी आणि पडताळणी प्रक्रियेला लागणारा अतिरिक्त वेळ लक्षात घेऊन हा निर्णय घेतला जाऊ शकतो. राज्यातील अनेक भागांत, विशेषतः मुंबई आणि पुण्यात, फॉर्म भरण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी होत असून तांत्रिक अडचणी आणि प्रक्रियेतील गुंतागुंत यामुळे मुदतवाढीची मागणी करण्यात आली होती. तसेच निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार बूथ लेव्हल ऑफिसर्स (बीएलओ) घराघरांत जाऊन मतदारांची पडताळणी करत आहेत.

**जाहीर प्रगटन**

पाटील प्रबतराव शिवराम राहणार बावलगाव तालुका, चाकूर जिल्हा लातूर येथील रहिवासी असून लातूर , To, उदगीर महामंडळ बस मध्ये प्रवास करीत असताना बी फार्मसी मूळ पदवी प्रमाणपत्र व इतर सोबत कागदपत्र हरवलेले आहे, SRTMUN University Nanded ओरीजनल डिग्री सर्टीफिकेट हरवलंय आहे कोणाला सापडले तर खालीली नंबर वरती संपूर्क साधावा 7588549868

# मांझरखेड येथे कृषी विद्यार्थ्यांकडून आधुनिक फळबाग लागवडीचे प्रात्यक्षिक; शेतकऱ्यांना तंत्रशुद्ध मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्स्ना करवाडे मांझरखेड (कसबा) :** ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून फळबाग लागवड अधिक शास्त्रीय पद्धतीने करावी आणि उत्पादनासोबतच गुणवत्तेतही वाढ साधावी, या उद्देशाने अमरावती येथील श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मांझरखेड (कसबा) येथे विशेष मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिके, चार्ट्स व पोस्टर्सच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक फळबाग लागवडीच्या विविध तंत्रांची सविस्तर माहिती दिली.

हा उपक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. चंद्रशेखर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि परवानगीने ग्रामीण उद्यानविद्या कार्यानुभव (RHWE) कार्यक्रमांतर्गत राबविण्यात आला. कार्यक्रमात महाविद्यालयाचे विद्यार्थी प्रज्वल गावंडे, ऋषिकेश मर्डीकर, प्रज्वल गजिभ्ये, शुभम अमझरे, सार्थक कराळे आणि सुजल मुळे यांनी सक्रिय सहभाग घेतला.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी फळबाग लागवडीसाठी जमिनीची निवड, मृदा परीक्षण, खड्डे तयार करण्याची योग्य पद्धत, दर्जेदार रोपांची निवड, लागवडीतील योग्य अंतर, ठिबक सिंचनाचा प्रभावी वापर, सेंद्रिय व रासायनिक खतांचे संतुलित व्यवस्थापन, फळबागेतील रोग व कीड नियंत्रण, छाटणी, आंतरमशागत तसेच उत्पादनवाढीसाठी



आवश्यक आधुनिक तंत्रज्ञान याबाबत सविस्तर माहिती दिली.

यावेळी शेतकऱ्यांनी फळबाग लागवडीतील विविध अडचणी, बदलते हवामान, रोग-कीड व्यवस्थापन, पाण्याची उपलब्धता, बाजारपेठेतील आव्हाने आदी विषयांवर विद्यार्थ्यांना प्रश्न विचारले. विद्यार्थ्यांनी शास्त्रीय माहितीच्या आधारे प्रत्येक प्रश्नाचे समाधानकारक उत्तर देत शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन केले.प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांमुळे शेतकऱ्यांना आधुनिक उद्यानविद्या तंत्रज्ञानाची माहिती सहज समजली. या मार्गदर्शनाचा फायदा भविष्यात फळबाग लागवडीचे नियोजन करताना निश्चितच होईल, असा विश्वास उपस्थित शेतकऱ्यांनी व्यक्त केला.कार्यक्रमाच्या शेवटी शेतकऱ्यांनी महाविद्यालयाच्या या उपक्रमाचे कौतुक करत अशा प्रकारचे मार्गदर्शन नियमितपणे ग्रामीण भागात आयोजित करण्याची अपेक्षा व्यक्त केली. विद्यार्थ्यांनीही शेतकऱ्यांशी सातत्याने संवाद साधून आधुनिक आणि शाश्वत शेती तंत्रज्ञान गावागावात पोहोचविण्याचा संकल्प व्यक्त केला.

# कारसूळच्या चार अनुसूचित जाती–जमातीच्या विद्यार्थिनींना पंजाब नॅशनल बँकेची शिष्यवृत्ती

## सीएसआर उपक्रमांतर्गत शिक्षणाला आर्थिक बळ; ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थिनींसाठी दिलासादायक पुढाकार



**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** भारत सरकारच्या "विकसित भारत" या दूरदृष्टीपूर्ण संकल्पनेला अनुसरून पंजाब नॅशनल बँकेच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) उपक्रमांतर्गत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थिनींसाठी राबविण्यात येणाऱ्या विशेष शिष्यवृत्ती योजनेत निफाड तालुक्यातील कारसूळ येथील चार विद्यार्थिनींची निवड करण्यात आली आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागातील होतकरू व गुणवंत विद्यार्थिनींना शिक्षणासाठी आर्थिक आधार मिळणार असून त्यांच्या उच्च शिक्षणाच्या वाटचालीसही मोठे बळ मिळणार आहे.

या योजनेअंतर्गत पीएमश्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कारसूळ तसेच जनता विद्यालय, कारसूळ येथील इयत्ता ७ वी, ८ वी, ९ वी आणि १० वीतील प्रत्येकी एका विद्यार्थिनीची निवड पंजाब नॅशनल बँकेमार्फत करण्यात आली आहे. निवड झालेल्या विद्यार्थिनींना इयत्तेनुसार टप्प्याटप्प्याने शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात येणार असून त्यामुळे त्यांच्या शिक्षणावरील आर्थिक भार मोठ्या प्रमाणात हलका होणार आहे.

शिष्यवृत्ती योजनेत गायत्री ज्ञानेश्वर शेखरे (इयत्ता ७ वी) हिला सलग चार वर्षांसाठी लाभ मिळणार असून सातवी व आठवीसाठी प्रत्येकी ३ हजार रुपये, तर नववी व दहावीसाठी प्रत्येकी ५ हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जाणार आहे.

राजेश्वरी पांडुरंग गुंबाडे (इयत्ता ८ वी) हिला सलग तीन वर्षांसाठी शिष्यवृत्ती मंजूर झाली असून आठवीसाठी ३ हजार रुपये, तर नववी व दहावीसाठी प्रत्येकी ५ हजार रुपये मिळणार आहेत.

पूजा बाळू शेखरे (इयत्ता ९ वी) हिला सलग दोन वर्षांसाठी नववी व दहावीत प्रत्येकी ५ हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार आहे.तर कल्याणी केशव जाधव (इयत्ता १० वी) हिला एक वर्षासाठी ५ हजार रुपयांची शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली आहे.

या शिष्यवृत्ती योजनेमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थिनींना शिक्षण सुरू ठेवण्यासाठी आवश्यक आर्थिक मदत मिळणार असून त्यांच्यामध्ये उच्च शिक्षणाची प्रेरणा निर्माण होणार आहे. ग्रामीण भागातील मुलींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी पंजाब नॅशनल बँकेने उचललेले हे पाऊल निश्चितच समाजासाठी प्रेरणादायी ठरणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

यावेळी पिंपळगाव केंद्राचे केंद्रप्रमुख राहुल परदेशी, पंजाब नॅशनल बँकेचे शाखा व्यवस्थापक प्रसन्न गायकवाड, कृषी अधिकारी दीपिका महाले, स्कूल कमिटी अध्यक्ष भाऊसाहेब शंखपाळ, टेंभी गावचे सरपंच श्रीनिवास गवळी, शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य देवेंद्र काजळे, जि.प. शाळेचे मुख्याध्यापक रमाकांत शिंदे, जनता विद्यालयाचे मुख्याध्यापक सागर जाधव, उपशिक्षक राजाभाऊ कदम, महेश कोर, संदीप बैरागी, प्रतिभा सावंत, कल्याणी वाशीकर, प्रिती चौधरी, प्रतिभा क्षिरसागर, मोहिनी शिंदे, मनिषा निमसे, नेहा देशमुख, अवंती गायकवाड, वासुदेव पाटील, रोहिणी शंखपाळ, संदीप बोचरे आणि रविंद्र ढोमसे यांच्यासह ग्रामस्थ व पालक उपस्थित होते.

# कामचुकार कर्मचाऱ्यांवर कारवाईअभावी पनवेलमध्ये फूटपाथ अतिक्रमण कायम

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** पनवेल महापालिका हद्दीतील फूटपाथवरील अतिक्रमणाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून, अतिक्रमण विभागातील कामचुकार कर्मचाऱ्यांवर कारवाई होत नसल्याने बेकायदेशीर अतिक्रमणे हटविण्याची मोहीम प्रभावीपणे राबवली जात नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

विशेषतः महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या ड प्रभागातील सेक्टर १७ येथील मंगलमूर्ती रोज बाजार परिसरात फूटपाथवर सायंकाळी मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर खाद्यपदार्थ स्टॉल, टपऱ्या आणि हातगाड्यांचे अतिक्रमण झाल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. या अतिक्रमणामुळे पादचाऱ्यांना चालण्यासाठी फूटपाथ उपलब्ध राहत नसून, त्यांना रस्त्यावरून जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या परिसरातील काही टपरीधारक स्वतःच्या टपऱ्यांव्यतिरिक्त फूटपाथवरील जागा इतर विक्रेत्यांना भाड्याने देऊन आर्थिक लाभ घेत असल्याचाही आरोप करण्यात येत आहे. याबाबत वारंवार तक्रारी आणि वृत्तप्रसार माध्यमांतून बातम्या प्रसिद्ध होऊनही संबंधित विभागाकडून ठोस कारवाई होत नसल्याची नाराजी व्यक्त केली जात आहे.



नागरिकांनी महापालिका आयुक्तांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन अतिक्रमण विभागातील निष्क्रिय कर्मचाऱ्यांची चौकशी करावी, जबाबदारी निश्चित करून आवश्यक ती शिस्तभंगाची कारवाई करावी, तसेच सेक्टर १७ येथील मंगलमूर्ती रोज बाजार परिसरातील फूटपाथवरील सर्व बेकायदेशीर खाद्यपदार्थ स्टॉल, टपऱ्या आणि अतिक्रमणे तातडीने हटवावीत, अशी मागणी केली आहे. अतिक्रमण विभागातील काही कर्मचारी अधिकाऱ्यांना आर्थिक सेटिंग करत असल्याने काही बेकायदेशीर खाद्यपदार्थ विक्रेत्यांना अतिक्रमणची गाडी येणार असल्याचे पूर्वकल्पना देऊन फेरीवाल्यांना सावध करत असतात.

# रावसाहेब निवासी मतिमंद विद्यालयात आरोग्य व दंत तपासणी शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे देवळी (वर्धा) :** रावसाहेब निवासी मतिमंद विद्यालय, देवळी येथे दिनांक 15 जुलै 2026 रोजी विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने मोफत आरोग्य व दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात जिल्हा ग्रामीण रुग्णालय, देवळी येथील वैद्यकीय पथकाने विद्यार्थ्यांची सर्वसाधारण आरोग्य तपासणी तसेच दंत तपासणी केली. तपासणीनंतर आवश्यक त्या विद्यार्थ्यांना मोफत औषधांचे वाटप करण्यात आले.

यावेळी डॉ. कांबळे मॅडम व त्यांच्या सहकारी वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना




आरोग्याची काळजी घेण्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयाचे शाळाप्रमुख श्री. जीवन टाले सर, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य केले.विद्यार्थ्यांच्या आरोग्य संवर्धनासाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे पालक व उपस्थितांनी कौतुक केले.

# स्त्री शक्ती फाउंडेशनच्या पाठपुराव्याला यश; कळंबोलीतील धोकादायक उघडी विद्युत केबल अखेर जमिनीत

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** कळंबोली येथील सेक्टर-5 ई मधील ओंकार ओनर्स असोसिएशन (केएल-1) परिसरात उघड्यावर पडून असलेली धोकादायक वीज केबल अखेर जमिनीत टाकण्यात आली आहे. स्त्री शक्ती फाउंडेशनच्या व एनजीओ संपर्क आघाडी भाजपा कळंबोलीच्या अध्यक्षा विजया कदम यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे महिनाभर रखडलेले हे काम पूर्ण झाल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

महावितरणने सुमारे महिनाभरापूर्वी या परिसरात नवीन वीज केबल टाकली होती. मात्र ही केबल जमिनीत पुरण्याऐवजी रस्त्यावरच उघडी ठेवण्यात आली होती. त्यामुळे नागरिकांना ये-जा करताना मोठा अडथळा निर्माण होत होता. त्यातच उंदरांनी केबल कुरतडल्याने पावसाळ्यात वीज प्रवाहामुळे अपघात होण्याचा धोका निर्माण झाला होता. या गंभीर समस्येबाबत रहिवाशांनी महावितरणकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याची नाराजी व्यक्त केली जात होती.

दरम्यान, येथील रहिवासी गणेश रणदिवे यांनी ही बाब विजया कदम यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर त्यांनी स्थानिक वीज कर्मचारी तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सलग




आठ दिवस सातत्याने पाठपुरावा केला. अखेर महावितरणने रखडलेले काम हाती घेत उघड्यावर पडलेली वीज केबल जमिनीत टाकून सुरक्षित केली.

याशिवाय परिसरातील जुने व तुटलेले तीन ते चार वीज वितरण पेटारे (डीपी बॉक्स) पुढील चार ते पाच दिवसांत दुरुस्त करून सुरक्षितरीत्या बंदिस्त करण्यात येतील, असे आश्वासन महावितरणच्या अधिकाऱ्यांनी दिले आहे.

महिनाभर प्रलंबित असलेले हे काम पूर्ण झाल्याने परिसरातील नागरिकांनी विजया कदम तसेच स्त्री शक्ती फाउंडेशनचे आभार मानले. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने वेळेत झालेली ही कार्यवाही अत्यंत महत्त्वाची ठरल्याची भावना स्थानिक रहिवाशांनी व्यक्त केली.

# ग्रामसेवक पतसंस्थेचे अध्यक्ष नंदकिशोर भगत यांच्यावरील सर्व आरोप बिनबुडाचे, १८ संचालकांचा अध्यक्षांना खंबीर पाठिंबा

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** रायगड जिल्हा ग्रामसेवक सहकारी पतसंस्था मर्या. पेण येथील चेअरमन व सेक्रेटरी नियमबाह्य पद्धतीने कारभार करत असल्याचा आरोप करत काही संचालकांनी जिल्हा उपनिबंधकांकडे तक्रार दाखल केली होती. मात्र, संस्थेचे अध्यक्ष नंदकिशोर कृष्णा भगत आणि सेक्रेटरी विवेक हरीभाऊ म्हात्रे यांनी जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था, रायगड अलिबाग) यांच्याकडे मुद्द्यांनुसार सविस्तर कायदेशीर खुलासा सादर करत सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. तक्रारदार संचालकांनी केवळ वैयक्तिक आकसापोटी आणि राजकीय द्वेषातून पतसंस्थेला व अध्यक्षांना बदनाम करण्याचा कट रचल्याचे या खुलाशावरून स्पष्ट होत आहे.

यातील मुख्य तक्रारदार आणि पतसंस्थेचे संचालक आकाश पाटील यांनी १६ जुलै रोजी जिल्हा उपनिबंधकांना लेखी पत्र देऊन आपली तक्रार पूर्णपणे मागे घेतली आहे. संचालक आकाश पाटील यांनी दिलेल्या पत्रात स्पष्ट केले आहे की, "मी दिनांक २२ जून रोजी केलेल्या तक्रारी अर्जावर मी केलेली सही माझ्या गैरसमजुतीने केली असून त्यावर माझी कोणतीही तक्रार नसून केलेला अर्ज मी मागे घेत आहे." तक्रारदाराने स्वतःच लेखी पत्राद्वारे आपली चूक मान्य केल्यामुळे अध्यक्ष नंदकिशोर कृष्णा भगत यांच्यावरील सर्व आरोप हे संपूर्णपणे बिनबुडाचे आणि केवळ संभ्रमातून निर्माण झाले होते, यावर आता अधिकृत शिक्कामोर्तब झाले आहे.

यापूर्वी तक्रारदार संचालक वैभव बाळकृष्ण पाटील व आकाश पाटील यांनी नंदकिशोर भगत यांच्या बदलीचा मुद्दा उपस्थित करत त्यांच्या अध्यक्षपदावर आक्षेप घेतला होता. मात्र, याच बदलीच्या मुद्द्यावर गेल्यावर्षी २१ एप्रिल २०२५ रोजी देखील तक्रार करण्यात आली होती आणि २४ एप्रिल २०२५ रोजी स्वतः तक्रारदार संचालकांनीच 'तक्रार अर्ज मागे घेणे बाबत' लेखी पत्र दिले होते, ज्यावरून उपनिबंधक कार्यालयाने ती तक्रार निकाली काढली होती. त्यामुळे नंदकिशोर भगत यांचे अध्यक्षपद कायदेशीररीत्या पूर्णपणे वैध व अबाधित आहे. तसेच, निवडणुकीत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सर्व प्रक्रिया 'जिल्हा मतदार संघ' विचारात घेऊनच



पार पाडल्यामुळे तांत्रिक दृष्ट्याही अध्यक्षांचे पद वैध ठरते. याशिवाय दिलीप तुरे यांच्या कर्ज प्रकरणाबाबत आणि इमारत दुरुस्तीच्या कामाबाबत करण्यात आलेले आरोपही पूर्णपणे खोटे ठरले आहेत. थकबाकीदार तुरे यांनी ५० हजार रुपयांचा धनादेश संस्थेत जमा केला असून, उर्वरित रक्कम पेन्शन व इतर लाभांमधून थेट कपात करण्यास लेखी संमती दिली आहे. इमारत दुरुस्तीचे कामही सर्व संचालक मंडळाच्या संमतीने आणि सर्वात कमी दर असलेल्या निविदाधारकाला (L1) देऊन पारदर्शकपणे करण्यात आले आहे. अवघ्या दोन दिवसांत माहिती मिळाली नाही म्हणून तक्रार करणे आणि सोशल मीडियावर संस्थेची नाहक बदनामी करणे, ही तक्रारदारांची खोडसाळ मानसिकता दर्शवते.

या पार्श्वभूमीवर, पतसंस्थेच्या २० पैकी तब्बल १८ संचालकांनी अध्यक्षांच्या बाजूने खंबीर उभे राहत जिल्हा उपनिबंधकांना जाहीर आव्हान दिले होते. संस्थेची नाहक बदनामी करणाऱ्या तक्रारदार संचालकांना तात्काळ निलंबित करावे, अन्यथा हे संपूर्ण संचालक मंडळ बरखास्त करून नव्याने सार्वत्रिक निवडणुका जाहीर कराव्यात. वरील दोन्ही गोष्टी शक्य नसतील, तर आम्ही १८ संचालक सामूहिक राजीनामा देण्यास तयार आहोत, मात्र आमच्या राजीनाम्यानंतर अल्पमतात आलेले उर्वरित संचालक मंडळ बरखास्त करून महिनाभरात नवीन निवडणुका घ्याव्यात, अशी ठाम मागणी १८ संचालकांनी निवेदनातून केली होती. आता मुख्य तक्रारदारानेच 'गैरसमजुतीतून सही झाली' असल्याचे सांगत माघार घेतल्यामुळे पतसंस्थेचा कारभार अत्यंत पारदर्शक व कायदेशीर मार्गानेच सुरू असल्याचे सिद्ध झाले आहे. केवळ वैयक्तिक आकसापोटी संस्थेला बदनाम करणाऱ्या विरोधकांचे मनसुबे या लेखी माघारीमुळे पूर्णपणे उधळले गेले असून, पतसंस्थेमध्ये अध्यक्ष नंदकिशोर भगत यांचे स्थान आणि पाठिंबा अधिक मजबूत झाला आहे.

# पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड–अलिबाग आणि डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ फार्मसी अँड रिसर्च सेंटर, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने १५ जुलै रोजी जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे यशस्वी आयोजन करण्यात आले.कार्यक्रमास सचिन जाधव, उप आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागीय आयुक्तालय, मुंबई विभाग, श्रीकांत कोकाटे, प्रभारी सहाय्यक आयुक्त, जिल्हा



कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड–अलिबाग, महाविद्यालयाचे चेअरमन धनराज विसपुते तसेच प्राचार्य डॉ. आशिष जैन यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना कौशल्य विकास, रोजगाराच्या संधी, अप्रेंटिसशिप तसेच उद्योजकतेचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. या रोजगार मेळाव्यात मॅन्युफॅक्चरिंग, औषधनिर्माण, पॅकेजिंग, ऑटोमोबाईल, मानव संसाधन तसेच इतर विविध औद्योगिक क्षेत्रांतील उद्योग-आस्थापनांनी सहभाग नोंदविला. २८० विद्यार्थी व युवकांनी मेळाव्याचा लाभ घेत रोजगाराच्या संधी, अप्रेंटिसशिप, कौशल्य विकास प्रशिक्षण तसेच विविध शासकीय योजनांची माहिती मिळविली. विद्यार्थी व नोकरी इच्छुकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभल्याने हा रोजगार मेळावा अत्यंत यशस्वी व उपयुक्त ठरला.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाचा ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्याकडे धडक एल्गार; अवैध धंद्यांविरोधात कठोर कारवाईची मागणी!

## रिसोड शहरासह ग्रामीण भागातील वरली मटका, देसी-विदेशी व हातभट्टी दारू अड्ड्यांवर वेशांतर करून धाडी टाकण्याची जोरदार मागणी; ठाणेदारांचे तातडीच्या कारवाईचे ठाम आश्वासन

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : रिसोड शहरासह ग्रामीण भागात सुरू असलेल्या वरली मटका, हातभट्टी दारू, देसी-विदेशी दारू विक्री तसेच इतर अवैध धंद्यांविरोधात आता निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाने आक्रमक भूमिका घेतली आहे. समाजात वाढत्या व्यसनाधीनतेमुळे युवकांचे भविष्य धोक्यात येत असल्याची गंभीर दखल घेत निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी रिसोडचे कर्तव्यदक्ष व दबंग ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. अवैध धंदे तात्काळ बंद करून संबंधित ठिकाणी गुप्त माहितीच्या आधारे वेशांतर करून अचानक धाडी टाकण्यात याव्यात, गुन्हेगारांवर कठोर कारवाई करून त्यांना तात्काळ अटक करण्यात यावी, अशी ठाम मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

निवेदनात नमूद करण्यात आले की, रिसोड शहरासह अनेक ग्रामीण भागांमध्ये काही ठिकाणी खुलेआम वरली मटका, हातभट्टी दारू, देसी-विदेशी दारू विक्रीसारखे अवैध धंदे सुरू असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. या धंद्यांमुळे विशेषतः युवक वर्ग मोठ्या प्रमाणात व्यसनाच्या आहारी जात असून त्यांच्या शिक्षणावर, रोजगारावर आणि कुटुंबाच्या आर्थिक स्थितीवर विपरीत परिणाम होत आहे.

व्यसनाधीनतेमुळे अनेक घरांमध्ये आई-वडील, पत्नी, भाऊ, बहीण आणि शेजाऱ्यांशी किरकोळ कारणांवरून वाद, भांडणे, मारहाण तसेच कौटुंबिक कलह वाढत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले. अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होत असून सामाजिक वातावरण बिघडत आहे. त्यामुळे या अवैध धंद्यांवर वेळीच कठोर कारवाई करणे अत्यंत आवश्यक असल्याचे पत्रकार संघाने स्पष्ट केले.

निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ हा समाजहिताच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवणारा आणि जनतेच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवणारा संघ असल्याने सामाजिक बांधिलकी जपत हे निवेदन देण्यात आले. युवकांना व्यसनमुक्त करून समाजात कायद्याचा धाक निर्माण व्हावा, यासाठी पोलीस प्रशासनाने कोणत्याही दबावाला बळी न पडता कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाचे वाशिम जिल्हाध्यक्ष करण धोंगडे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन सादर करण्यात आले. त्यांच्यासमवेत रिसोड तालुका अध्यक्ष रणजीतसिंह ठाकूर तसेच ग्रामीण तालुकाध्यक्ष गोपाल बोरकर पाटील उपस्थित होते.

निवेदन स्वीकारल्यानंतर ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांनी पत्रकार संघाच्या मागण्यांची गांभीर्याने दखल घेत, अवैध धंदे कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाणार नाहीत, अशी स्पष्ट भूमिका मांडली. ज्या-ज्या ठिकाणी अशा प्रकारचे अवैध व्यवसाय सुरू असल्याची माहिती मिळेल, त्या-त्या ठिकाणी गुप्त पथकांच्या माध्यमातून, आवश्यक असल्यास वेशांतर करून अचानक धाडी टाकण्यात येतील. संबंधित व्यक्तींवर महाराष्ट्र दारूबंदी कायदा, जुगार प्रतिबंधक कायदा तसेच लागू असलेल्या इतर कायद्यांनुसार गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

यानंतर ठाणेदार रामेश्वर चव्हाण आणि पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये कायदा व सुव्यवस्था, युवकांमधील वाढती व्यसनाधीनता, सामाजिक जबाबदारी, पत्रकारांची भूमिका, गुन्हे प्रतिबंध आणि जनजागृती यासह विविध विषयांवर सविस्तर व दिलखुलास चर्चा झाली. आपल्या व्यस्त कामकाजातून वेळ देऊन ठाणेदारांनी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी सकारात्मक संवाद साधला आणि समाजहितासाठी पोलीस व पत्रकार यांनी समन्वयाने काम करण्याची गरज व्यक्त केली.

निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाचे लाडके राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय गणेशजी कचकलवार यांच्या मार्गदर्शनाखाली वाशिम जिल्ह्यात संघटनेचे जनहिताचे कार्य वेगाने सुरू असून, समाजातील अन्याय, अवैध धंदे, भ्रष्टाचार आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर यापुढेही संघटना अधिक ताकदीने आवाज उठवणार असल्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

'अवैध धंदे करणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही. माहिती मिळताच गुप्त पथकांच्या माध्यमातून अचानक धाडी टाकून संबंधितांवर नियमानुसार कठोर गुन्हे दाखल करण्यात येतील. कायदा हातात घेणाऱ्यांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही.'

— रामेश्वर चव्हाण, ठाणेदार, रिसोड पोलीस ठाणे

'समाजातील युवकांना व्यसनाच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी अवैध धंद्यांवर तातडीने कठोर कारवाई होणे अत्यंत गरजेचे आहे. आमच्या निवेदनाची दखल घेऊन पोलीस प्रशासनाने प्रभावी आणि सातत्यपूर्ण कारवाई करावी, हीच आमची अपेक्षा आहे.'

— करण धोंगडे, जिल्हाध्यक्ष वाशिम,निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ

# मंत्रालयातील बैठक रद्द; तरीही 'सिद्धगड' बंगल्यावर विकासाचा पाठपुरावा आमदार गजाननभाऊ लवटे यांना मंत्री दत्तात्रयजी भरणे यांचे ठोस आश्वासन

**दैनिक युवक आधार**

**दर्यापूर ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी** : अंजनगाव सुर्जी शहराच्या विकासासाठी महत्त्वाची ठरणारी तालुका बीज गुणन केंद्राच्या ताब्यातील सुमारे सात एकर शासकीय जमीन शहराच्या विकासकामांसाठी उपलब्ध करून देण्याबाबत मंत्रालयात आयोजित करण्यात आलेली उच्चस्तरीय बैठक काही अपरिहार्य कारणांमुळे पुढे ढकलण्यात आली. मात्र, या विषयाचा पाठपुरावा थांबू न देता आमदार गजाननभाऊ लवटे यांनी थेट मंत्री दत्तात्रयजी भरणे यांची मुंबई येथील 'सिद्धगड' शासकीय निवासस्थानी भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

या भेटीदरम्यान शहराच्या विकासासाठी सात एकर जमीन उपलब्ध करून देण्याची गरज, त्यातून होणारे सार्वजनिक हिताचे प्रकल्प तसेच स्थानिक नागरिकांच्या अपेक्षा याबाबत आमदार लवटे यांनी मंत्र्यांसमोर सविस्तर मांडणी केली. त्यावर मंत्री दत्तात्रयजी भरणे यांनी हा विषय गांभीर्याने घेत लवकरच नव्याने बैठक आयोजित करून प्रस्तावावर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे स्पष्ट आश्वासन दिले.

यावेळी मंत्री भरणे यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधून प्रकरणाचा वेगाने निपटारा



करण्याचे निर्देश देण्यात येतील, तसेच शासनस्तरावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असेही सांगितले. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी शासन सकारात्मक असून विकासकामांमध्ये कोणतीही अडचण येऊ दिली जाणार नाही, असे त्यांनी नमूद केले.

आमदार गजाननभाऊ लवटे यांनीही या प्रश्नाचा सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचे सांगितले. अंजनगाव सुर्जीच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या सात एकर जमिनीचा प्रश्न लवकरच मार्गी लागेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शहर विकासाला मिळणार गती
तालुका बीज गुणन केंद्राच्या ताब्यातील सुमारे ७ एकर जमीन उपलब्ध करण्याचा प्रस्ताव.
मंत्रालयातील बैठक पुढे ढकलली असली तरी विषयावर चर्चा कायम.
मंत्री दत्तात्रयजी भरणे यांचे सकारात्मक निर्णयाचे आश्वासन.
आमदार गजाननभाऊ लवटे यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू.
जमीन उपलब्ध झाल्यास शहरातील विविध विकासकामांना चालना मिळण्याची अपेक्षा.

# दुबार पेरणीचे संकट; बळीराजा पावसाच्या प्रतीक्षेत

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार** : तालुक्यासह परिसरात सुरुवातीला झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने खरीप पिकांची पेरणी केली. मात्र त्यानंतर पावसाने दडी मारल्याने अनेक ठिकाणी पिकांची उगवण खुंटली असून रोपे करपण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढावले आहे.

सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद आदी पिकांसाठी ओलाव्याची नितांत गरज असताना गेल्या काही दिवसांपासून पाऊस नसल्याने शेतातील माती कोरडी पडली आहे. पेरणीसाठी केलेला खर्च वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे. दुबार पेरणी करावी लागल्यास बियाणे, खते आणि मशागतीचा अतिरिक्त खर्च उचलणे अनेक शेतकऱ्यांसाठी कठीण ठरणार आहे.

यंदाच्या हंगामाकडून मोठ्या अपेक्षा असलेल्या बळीराजाची नजर आता आकाशाकडे लागली असून, लवकरात लवकर समाधानकारक पाऊस पडावा, अशी प्रार्थना शेतकरी करत आहेत. वेळेत पाऊस झाला तर पिकांना नवसंजीवनी मिळू शकते; अन्यथा दुबार पेरणी अटळ ठरण्याची भीती व्यक्त होत आहे.

# मादक पदार्थ व बालविवाह सर्वांसाठी घातक: डॉ. प्रतीक सुराणा

## ज्ञानविकास विद्यालयात नशामुक्त व बालविवाह मुक्त समाजासाठी विशेष व्याख्यान

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकरजिल्हा प्रतिनिधी** : नशामुक्त व बालविवाह प्रतिबंध जनजागृती पंधरवाड्यानिमित्त सिल्लोड तालुक्यातील भराडी येथील श्रीमान अशोकदादा गरुड शैक्षणिक समूहाच्या ज्ञानविकास विद्यालयात आयोजित व्याख्यानात वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रतीक सुराणा यांनी मार्गदर्शन केले. "नशामुक्त जीवन जगल्याशिवाय आपली शारीरिक व आर्थिक उन्नती होऊच शकत नाही. मादक पदार्थ सेवन करूही द्यायचे नाहीत व करायचेही नाहीत. अशा पदार्थांपासून प्रत्येकाच्या आयुष्याला वाईटच दिवस आल्याचे बघायला मिळते, म्हणून कुठल्याही प्रकारची नशा होता कामा नये," असे प्रतिपादन डॉ. सुराणा यांनी केले.

एकात्मिक बालविकास विभागाच्या पर्यवेक्षिका श्रीमती वाघणारे म्हणाल्या की, "बालविवाह रोखून शैक्षणिक पात्रता वाढविल्यास आयुष्य सुखकर होण्यास मदत होईल." याप्रसंगी उपस्थित मान्यवर, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी दोन्ही सामाजिक समस्या घडू नयेत, यासाठी प्रतिज्ञापूर्वक शपथ घेतली.

यावेळी श्री रायभान जाधव, गणेश ठोंबरे, वंदना पालकर, नरेश बलकार, अमोल गरुड, संदीप खडोळ, शिंदे डी. टी. यांच्यासह अंगणवाडी सेविका सुशीला अग्रवाल, चंदाराणी धारकर, जयश्री आराक, तारा सोनवणे, सुनिता दागोडे, सविता शेळके, मनीषा डोळस, प्रमिला माकोडे आदी उपस्थित होत्या.




विद्यार्थ्यांचे फलकांमार्फत प्रबोधन
कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी 'बालविवाह आहे सामाजिक आजार, दूर करूया मिळून सारे यार', 'जिथे शिक्षण तिथे प्रगती, बालविवाह रोखून घडवू प्रगती', 'आयुष्याची स्वप्ने अपूर्ण राहू देऊ नका, बालविवाहाच्या आगीत बालपण जाळू नका', 'नको बालविवाह, हवा आता प्रगतीचा मार्ग', 'मुलगी शिकली, प्रगती झाली; बालविवाह थांबला, समाज बदलला', 'वयाची अट पूर्ण करा, बालविवाहाचा त्याग करा' व 'बालपण हे फुलपाखरू, लग्नाच्या बेडीत त्याला अडकवू नको' अशा घोषणांचे फलक झळकवत जनजागृती केली.

# पावसाचा खंड,अकोला जिल्हातील शेतकरी तिहेरी संकटात

# पावसाने पुन्हा दडी मारल्याने पिके धोक्यात

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे प्रतिनिधी:**यंदाचा खरीप हंगाम अकोला जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत खडतर ठरत आहे. जिल्ह्यातील शेतकरी सध्या दुहेरी नव्हे, तर चक्क तिहेरी संकटाचा सामना करत आहेत. एका बाजूला बोगस किंवा निकृष्ट दर्जाच्या बियाण्यांमुळे पेरणी वाया गेली आहे, तर दुसऱ्या बाजूला पावसाने पुन्हा दडी मारल्याने हातात आलेली पिकेही करपू लागली आहेत. यामुळे बळीराजा पूर्णपणे आर्थिक कोंडीत सापडला आहे.

जिल्ह्यात मान्सूनच्या सुरुवातीला शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने पेरण्या केल्या. मात्र, निसर्गाची अवकृपा आणि बाजारातील अनिश्चिततेमुळे शेतकरी मोठ्या संकटांत अडकला आहे शेतकऱ्यावर आता अनेक भागात दुबार आणि तिबार पेरणीचे संकट आले आहे. अनेक भागांत ,बोगस बियाणे मुळे पेरलेले बियाणे उगवलेच नाही. त्यामुळे शेतकऱ्यांवर आधी दुबार आणि काही ठिकाणी तर चक्क तिबार पेरणी करण्याची वेळ आली आहे.

कसाबसा खर्च करून ज्या शेतकऱ्यांची पिके उगवली, त्यांना आता पावसाने दगा दिला आहे. गेल्या ८ते १० दिवसांपासून



पावसाने दडी मारल्यामुळे जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत आहे आणि कडक उन्हामुळे पिके कोमेजू लागली आहेत.

लागोपाठ कराव्या लागणाऱ्या पेरण्यांमुळे बियाणे, खते आणि महागड्या कीटकनाशकांवर होणारा खर्च दुप्पट-तिप्पट वाढला आहे. उत्पादन खर्च आवाक्याबाहेर गेल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक बजेट पूर्णपणे कोलमडले आहे.

"पहिले बियाणं उगवलं नाही म्हणून कर्ज काढून दुसऱ्यांदा पेरणी केली. आता पिके वर आली तर पाऊस गायब झालाय. खतं आणि औषधांचे पैसे दुकानातून उधारीवर आणलेत. पाऊस असाच राहिला तर शेतात लावलेला पैसाही वसूल होणार नाही," अशी उद्विग्न प्रतिक्रिया जिल्ह्यातील शेतकऱ्यानी दिली आहे.

जिल्ह्यातील बहुतांश भागात बाजारातून महागड्या दराने बियाणे व खते खरेदी करावी लागल्याने शेतकऱ्यांवर सावकाराचे कर्ज काढण्याची वेळ आली आहे.

परिस्थितीचे गांभीर्य पाहता, कृषी विभागाने तातडीने नुकसानीचे पंचनामे करावेत आणि ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे , त्यांना तात्काळ शासकीय मदत किंवा मोफत बियाने

उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. हवामान खात्याने लवकरच पावसाचे पुनरागमन होईल असा अंदाज वर्तवला असला, तरी सध्याची परिस्थिती पाहता अकोल्याचा शेतकरी चिंतेच्या गर्तेत सापडला आहे.

'आधी बोगस बियाण्यांनी घात केला, बँकांचे कर्ज काढून कशीबशी दुबार पेरणी केली. आता निसर्गानेही पाठ फिरवली. जर पुढील २-४ दिवसांत पाऊस आला नाही, तर हातात काहीच पडणार नाही.'

— सोयाबीन उत्पादक शेतकरी.

# महा. अंनिस पनवेल शाखेकडून संशयास्पद अघोरी/जादूटोणा प्रकरणी पोलिसांकडे तक्रार


**दैनिक युवक आधार**

**पनवेल (जि. रायगड)** : येथील तक्का राजस्थानी स्मशानभूमी परिसरातील एका निर्जन ठिकाणी लाल रंगाच्या कापडात अनोळखी महिला व पुरुषांचे फोटो बांधून ठेवलेले तसेच तंत्र-मंत्र, जादूटोणा किंवा अघोरी पूजेशी संबंधित असल्याचा संशय निर्माण करणारे साहित्य आढळून आल्याने स्थानिक नागरिकांमध्ये भीती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेची प्राथमिक माहिती केवळ महाडीक आणि गणेश वाघीलकर यांनी दिली.या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (महा. अंनिस) पनवेल शाखेकडून या घटनेची गंभीर दखल घेत पनवेल पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे. सदर प्रकार हा अंधश्रद्धा, करणी किंवा जादूटोणा यांसारख्या अनिष्ट व अघोरी प्रथांशी संबंधित असू शकतो, असा संशय व्यक्त करण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक अधिनियम, २०१३ अंतर्गत गुन्हा नोंदवून संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.सदर कृत्य हे कायद्यानुसार दखलपात्र व जामीनपात्र नसलेला गुन्हा असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.याबाबत महा. अंनिस पनवेल शाखेच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस अधिकारी पटेल यांची भेट घेऊन निवेदन दिले. पोलीस अधिकारी पटेल यांनी या प्रकरणाची माहिती घेऊन चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

# महागाई भत्त्यानुसार भारत सरकारच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्याची मागणी; केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**नांदेड | प्रतिनिधी : विश्वदीप कांबळे** : महागाई भत्त्यात सातत्याने होत असलेल्या वाढीच्या अनुषंगाने भारत सरकारकडून देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीच्या रकमेतही वाढ करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी फुले, शाहू, आंबेडकर विद्यार्थी कृती समिती, नांदेड (महाराष्ट्र राज्य) यांच्या वतीने केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री



मा. ना. रामदास आठवले यांना निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले की, वाढती महागाई, शिक्षण शुल्क, वसतिगृह खर्च, प्रवास व इतर शैक्षणिक खर्च लक्षात घेता सध्याची शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांसाठी अपुरी ठरत आहे. त्यामुळे महागाई भत्त्याच्या प्रमाणात भारत सरकारच्या शिष्यवृत्तीमध्ये तातडीने वाढ करून विद्यार्थ्यांना आर्थिक दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी समितीच्या पदाधिकाऱ्यांनी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय तसेच इतर लाभार्थी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी केंद्र सरकारने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी निवेदन स्वीकारून संबंधित मागणीचा सकारात्मक विचार केला जाईल, असे आश्वासन दिल्याचे समितीच्या वतीने सांगण्यात आले.

# रक्तदान म्हणजे जीवनदान; प्रत्येक थेंब ठरतो मानवतेचा श्वास – आ. सौ. सुलभाताई खोडके

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : "रक्तदान हे केवळ दान नसून एखाद्याला नवजीवन देणारे पवित्र कार्य आहे. रक्ताचा प्रत्येक थेंब एखाद्या गरजू रुग्णासाठी संजीवनी ठरतो. म्हणूनच प्रत्येक निरोगी नागरिकाने नियमित स्वेच्छा रक्तदान करून मानवतेच्या या महान कार्यात सहभागी व्हावे," असे भावनिक आवाहन आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी केले.

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीद्वारे संचालित डॉ. पंजाबराव देशमुख नर्सिंग इन्स्टिट्यूट येथे संस्थेचे संचालक डॉ. पद्माकर सोमवंशी यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित भव्य रक्तदान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. "रक्ताचा थेंब न थेंब मनुष्यासाठी वरदान... चला, उठूया करूया रक्तदान," असा संदेश देत त्यांनी उपस्थितांना स्वेच्छा रक्तदानासाठी प्रेरित केले.

आ. खोडके म्हणाल्या की, आजही अपघातग्रस्त, गंभीर शस्त्रक्रिया, प्रसूतीदरम्यान होणारा रक्तस्राव, थॅलेसेमिया, कर्करोग आणि इतर गंभीर आजारांवरील उपचारांसाठी मोठ्या प्रमाणावर रक्ताची गरज भासते. अशा वेळी वेळेवर उपलब्ध झालेले रक्त अनेकांचे प्राण वाचवते. रक्त कोणत्याही प्रयोगशाळेत तयार करता येत नाही. त्यामुळे समाजातील प्रत्येक सक्षम व्यक्तीने नियमित रक्तदान करणे ही काळाची गरज आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेला श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन (भैय्यासाहेब) देशमुख, कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, सचिव डॉ. व्ही. जी. ठाकरे, प्रा. सुभाषराव बनसोड, आमदार सौ. सुलभाताई खोडके तसेच विनोदराव



उभाड पाटील यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर रक्तदान शिबिराला प्रारंभ झाला.

यावेळी स्वेच्छा रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. तसेच डॉ. पद्माकर सोमवंशी यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त हर्षवर्धन देशमुख, सौ. निर्मलाताई देशमुख, दिलीपबाबू इंगोले आणि आमदार सुलभाताई खोडके यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

या रक्तदान शिबिरात श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय आणि डॉ. पंजाबराव देशमुख नर्सिंग इन्स्टिट्यूट येथील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत स्वेच्छेने रक्तदान केले. विद्यार्थ्यांच्या सामाजिक बांधिलकीच्या या उपक्रमामुळे उपस्थितांमध्येही रक्तदानाबाबत जागरूकता निर्माण झाली.

## डॉ. पद्माकर सोमवंशी यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिर; १११ रक्तपिशव्यांचे संकलन, स्वेच्छा रक्तदानाचा प्रेरणादायी संदेश

यावेळी सत्काराला उत्तर देताना डॉ. पद्माकर सोमवंशी यांनी आपल्या वैद्यकीय सेवेत लाभलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. "समाजाचे काही देणे लागते या भावनेतून वैद्यकीय क्षेत्रात सेवा देण्याचा प्रयत्न केला. कुटुंबीयांचे संस्कार, ज्येष्ठांचे मार्गदर्शन आणि सहकाऱ्यांचे सहकार्य यामुळेच हा प्रवास यशस्वी झाला. सर्वांचे प्रेम, विश्वास आणि जिव्हाळा हीच माझी खरी संपत्ती आहे," अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

विशेष म्हणजे, त्यांच्या वाढदिवसानिमित्त अमरावती विमानतळ येथे आयोजित रक्तदान शिबिरात ३० रक्तपिशव्या, तर डॉ. पंजाबराव देशमुख नर्सिंग इन्स्टिट्यूट येथे आयोजित शिबिरात ८१ रक्तपिशव्या संकलित झाल्या. अशा प्रकारे दोन्ही ठिकाणी मिळून एकूण १११ रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले.

कार्यक्रमाला अक्षय इंगोले, डॉ. प्रभुदास रायबोर्डे, अविनाश मार्डीकर, विनोद सोमवंशी, प्रकाश सोमवंशी, विनोदराव देशमुख, डॉ. पुष्पाताई सोमवंशी, अजिंक्य सोमवंशी, संयुक्ता सोमवंशी, नेहा सोमवंशी, अमित सोमवंशी, प्रा. डॉ. श्यामसुंदर सोमवंशी, अनंत (गोटूभाऊ) सोमवंशी, अभ्यूदय सोमवंशी, आदित्य सोमवंशी, शरद सोमवंशी, कल्याणी सोनखासकर, सौरभ सोनखासकर, मिलिंद खडे, अंकित कोहळे, प्रतीक खूरद, निलेश बोपुलकर, डॉ. योगानंद कुलकर्णी, महेश शर्मा, अरविंद गाडे, दीपक काळे यांच्यासह श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, रोटरी क्लब ऑफ इंडिया, पीडीएमसी ब्लड बँक आणि डॉ. पंजाबराव देशमुख नर्सिंग इन्स्टिट्यूटचे प्राध्यापक, विद्यार्थी व मोठ्या संख्येने मान्यवर उपस्थित होते.

रक्तदानाच्या माध्यमातून समाजाप्रती उत्तरदायित्व जपत मानवतेचा संदेश देणारा हा उपक्रम अमरावतीत प्रेरणादायी ठरला. नियमित रक्तदानाची गरज अधोरेखित करत अनेकांनी भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांत सक्रिय सहभाग नोंदविण्याचा संकल्प व्यक्त केला.

---

# राज्यस्तरीय साहित्य संमेलनाचा परिघ विस्तारित करावा – प्रा. शिवाजी वाठोरे

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : "परिवर्तनवादी साहित्य संमेलनात शिवराय - फुले - शाहू - आंबेडकर यांच्या विचारांशी निष्ठा असणारे साहित्यिक पाचारण करून साहित्य संमेलनाचा परिघ विस्तारित ठेवावा," असे आवाहन ख्यातनाम कवी, समीक्षक प्रा. शिवाजी वाठोरे यांनी येथे केले.

छत्रपती संभाजीनगर येथे येत्या ऑक्टोबर महिन्यात होऊ घातलेल्या 'परिवर्तनवादी साहित्य संमेलना'च्या पार्श्वभूमीवर शासकीय विश्रामगृहात आयोजित बैठकीत ते मार्गदर्शन करत होते. बैठकीच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे होते, तर विचारपीठावर संयोजक रतनकुमार साळवे, साखर संघाचे माजी अध्यक्ष के. ई. हरिदास, ॲड. डी. व्ही. खिल्लारे, प्रा. डॉ. प्रज्ञा साळवे उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रा. वाठोरे पुढे म्हणाले की, "परिवर्तन हे नाव धारण करून अनेक प्रतिगामी शक्ती साहित्य क्षेत्रात घुसलेल्या आहेत. त्यांच्यापासूनही सावध राहण्याची गरज असून, सध्याच्या काळात प्रतिक्रांतीवादी शक्ती डोके



वर काढत आहेत, याचाही आपण गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे." हे साहित्य संमेलन खऱ्या अर्थाने राज्यस्तरीय व्हावे, यासाठी त्यांनी आवश्यक त्या टिप्स दिल्या.

बैठकीत के. ई. हरिदास, ॲड. डी. व्ही. खिल्लारे, प्रा. डॉ. प्रज्ञा साळवे, प्रा. भारत सिरसाठ आदींनी आपले विचार व्यक्त केले. प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे यांनी अध्यक्षीय समारोप केला. प्रारंभी संयोजक रतनकुमार साळवे यांनी प्रास्ताविकात आपली भूमिका मांडली. बैठकीचे सूत्रसंचालन भीमराव गाडेकर यांनी केले, तर विनोद मोरे यांनी आभार मानले. बैठकीस साहित्य, शिक्षण, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# सिल्लोडच्या आदित्य मिरकरची जागतिक भरारी!

## स्वित्झर्लंडमधील 'फिजिक्स वर्ल्ड कप'मध्ये पटकावला 'ऑनरेबल मेंशन' बहुमान

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : छत्रपती संभाजीनगर:- स्वित्झर्लंडमधील झुरिच येथे ५ ते १२ जुलै २०२६ दरम्यान झालेल्या ३९ व्या आंतरराष्ट्रीय 'यंग फिझिसिस्ट्स टूर्नामेंट' (IYPT 2026) म्हणजेच 'फिजिक्स वर्ल्ड कप'मध्ये, सिल्लोडच्या आदित्य निलेश मिरकर याने भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करताना 'ऑनरेबल मेंशन' हा प्रतिष्ठेचा बहुमान मिळविला आहे. जागतिक स्तरावर सिल्लोडच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्याने आपली मोहोर उमटवल्याने त्याचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

**•जागतिक स्तरावर धडाकेबाज कामगिरी•**



भौतिकशास्त्र विषयातील या अत्यंत कठीण आणि प्रतिष्ठित स्पर्धेत ३५ देशांतील गुणवंत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. भारतीय संघाची निवड करण्यासाठी देशभरात पारदर्शक आणि कठीण निवड प्रक्रिया राबविली जाते. यातून निवड झालेल्या केवळ पाच विद्यार्थ्यांच्या संघात ग्रामीण भागातील आदित्यने स्थान पटकावले. जागतिक तज्ज्ञांसमोर भौतिकशास्त्रातील गुंतागुंतीच्या समस्यांवर त्याने केलेले सादरीकरण अत्यंत प्रभावी ठरले.

आदित्यच्या या यशात वडील डॉ. निलेश मिरकर आणि आई डॉ. सुषमा मिरकर यांच्या संस्कारांचा मोलाचा वाटा आहे. भारतीय संघाला टीम लीडर शशिकांत पांडे आणि नंदिनी तिवारी यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पंडित, प्रा. दत्ता काकडे, प्रा. संतोष लक्कस, प्रा. अंकुश जाधव यांच्यासह तालुक्यातील विविध मान्यवरांनी आदित्यचे अभिनंदन केले आहे.

**IYPT 2026 एका नजरेत**

स्पर्धेचे ठिकाणः ईटीएच झुरिच (ETH Zurich), स्वित्झर्लंड.

सहभागी देशः अमेरिका, चीन, जर्मनी, जपान, सिंगापूर, ऑस्ट्रेलियासह ३५ देश.

भारतीय संघः आदित्य मिरकर, कबीर गोयल, अर्जुन मल्होत्रा, सार्थक ढोले आणि रायन शानबाग.

विशेष उपलब्धीः ग्रामीण भागातून प्रतिनिधित्व करून 'ऑनरेबल मेंशन' किताब मिळवणारा एकमेव विद्यार्थी.

**ए.पी.जे. अब्दुल कलाम आदर्श**

आदित्य मिरकरची याआधीची शैक्षणिक वाटचालही प्रेरणादायी आहे. २०२५ मध्ये जपानमधील टोकियो येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत सर्वात कमी वयाचा शास्त्रज्ञ म्हणून शोधप्रबंध सादर करण्याचा मान त्याने मिळवला होता. तसेच, 'इंडियन स्पेस सायन्स ऑलिंपियाड'मध्ये देशातून दुसरा क्रमांक पटकावून त्याने आपली क्षमता सिद्ध केली आहे. 'ए.पी.जे. अब्दुल कलाम हे माझे प्रेरणास्थान असून, भविष्यात भारताच्या अंतराळ आणि क्षेपणास्त्र क्षेत्रात योगदान देण्याचा माझा मानस आहे,' असे आदित्यने व्यक्त केले.

---

# निर्भय युवा ग्रामीण पत्रकार संघ व निर्भय युवा समाजकार्य संघटन यांची आढावा बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूरगड प्रतिनिधी सय्यद इसा** : दिनांक 15 जुलै रोजी शासकीय विश्रामगृहमाहूर येथे निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ व निर्भय युवा समाजकार्य संघटन यांची आढावा बैठक संपन्न झाली यामध्ये माहूर तालुका व शहर नवीन कार्यकारणी गठित करण्यात आली ,निर्भय युवा ग्रामीण पत्रकार संघ माहूर . तालुका शहराध्यक्ष पदी ::कुंदन तीवडकर ,उपाध्यक्ष :गोपाल चव्हाण

सचिव :अंबादास मुकटे

सहसचिव :संजय वडसकर, कोषाध्यक्ष: सुरेश राठोड

सदस्य: धनंजय आराध्ये यांची निवड करण्यात आली या बैठकीमध्ये निर्भय युवा ग्रामीण पत्रकार संघामध्ये नव्याने आलेले सदस्य सुरेश राठोड, धनंजय आराध्ये, प्रमोद सोनकर यांचा पुष्पगुच्छ देऊन निर्भय युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश भाऊ कचकलवार यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला या बैठकीमध्ये निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ माहुर यांच्यावतीने तालुक्यातील सर्व समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करण्यात यावा या उद्देशाने ही बैठक



पार पडली या बैठकीला निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष अनिल माडपेलीवार, उपाध्यक्ष समाधान कांबळे , ता शहराध्यक्ष कुंदन तिवडकर सचिव सय्यद इसा ,शहराध्यक्ष सदस्य अंबादास मुकटे, गोपाल चव्हाण ,संजय वडसकर, मनोज जाधव ,आदित्य खंदारे ,सुरेश राठोड ,धनंजय आराध्ये व निर्भय समाजकार्य माहुर तालुका अध्यक्ष कुंदन तिवडकर ,ता उपाध्यक्ष ..... शहराध्यक्ष केशव भाऊ जाधव ,सदस्य शरीफ शेख, सादिक शेख, परविन जाधव, केशव जाधव ,हिरामण वाघमारे, आकाश ठाकूर हे उपस्थित होते या बैठकीचे प्रस्ताविक निर्भय युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष आ. गणेश भाऊ कचकलवार यांनी केले सूत्रसंचालन सय्यद इसा यांनी केले व आभार प्रदर्शन अनिल माडपेल्लीवार यांनी मानले.

---

# चोरंबा ग्रामपंचायतीत उच्चशिक्षित सरपंच मिळणार?; ग्रामस्थांमध्ये चर्चेला उधाण

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी : विश्वदीप कांबळे** : नांदेड जिल्ह्यातील चोरंबा ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गावात राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. यावेळी ग्रामपंचायतीला उच्चशिक्षित आणि पत्रकारितेत पदव्युत्तर (Master of Journalism) शिक्षण घेतलेला सरपंच मिळणार का, असा प्रश्न ग्रामस्थांमधून उपस्थित केला जात आहे.



गावाच्या विकासासाठी शिक्षण, प्रशासनाची जाण, कायद्याचे ज्ञान, पारदर्शक कारभार आणि लोकांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे आवाज उठविणारे नेतृत्व आवश्यक असल्याची भावना अनेक नागरिक व्यक्त करत आहेत. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत केवळ राजकीय समीकरणांपेक्षा पात्रता, शिक्षण आणि काम करण्याची क्षमता यांना मतदार किती महत्त्व देतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.दरम्यान, सरपंचपदासाठी विविध इच्छुक उमेदवारांनी तयारी सुरू केली असून अधिकृत उमेदवारांची घोषणा होताच निवडणुकीचे चित्र अधिक स्पष्ट होणार आहे. मात्र, "गावाला उच्चशिक्षित आणि पत्रकारितेत पदव्युत्तर शिक्षण घेतलेला सरपंच मिळणार का?" हा प्रश्न सध्या चोरंबा गावात चर्चेचा विषय ठरला आहे.याबाबत अंतिम निर्णय मात्र ग्रामस्थ मतदार आपल्या मतदानातून घेणार आहेत.

---

# बांधकाम कामगारांसाठी राज्य सरकारचा ऐतिहासिक निर्णय

**दैनिक युवक आधार**

**गणेश ताठे प्रतिनिधी** : राज्यातील लाखो नोंदणीकृत बांधकाम कामगार आणि त्यांचे कुटुंबीयांसाठी दिलासादायक ठरणारा महत्त्वाचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. कामगार विभागाने सुधारित कल्याणकारी योजनांना मंजुरी देत बांधकाम कामगारांच्या मृत्यू आणि दिव्यांगत्वावरील आर्थिक सहाय्यक मोठी वाढ केली आहे. या संदर्भातील शासन निर्णय कामगार मंत्री अँड .आकाश फुंडकर यांनी जारी केला असून, कामगारांच्या सामाजिक सुरक्षेला अधिक बळ मिळणार असल्याचे सांगण्यात आले आहे. नवीन निर्णयानुसार नोंदणीकृत बांधकाम कामगारांचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्यांच्या कायदेशीर वारसाला रुपये ३लाख 50 हजार इतकी एकर कमी आर्थिक मदत मिळणार आहे तर अपघाती मृत्यू झाल्यास संबंधित कुटुंबाला रुपये ६ लाख 50 हजार इतके आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. तसेच कामाच्या ठिकाणी किंवा अपघातामुळे कामगार कायमस्वरूपी दिव्यांग झाल्यास त्याला रुपये २लाख इतकी आर्थिक मदत देण्याची तरतूद करण्यात आली आहे. या सुधारित योजनांमुळे कामगारांचे कुटुंबांना आर्थिक आधार मिळण्यास मदत होणार आहे.

कामगार कल्याणचे दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात असून बांधकाम क्षेत्रातील असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षा कवच अधिक मजबूत करण्याचे दिशेने सरकारने पाऊल टाकल्याची भावना व्यक्त होत आहे. सुधारित लाभान मुळे नोंदणीकृत बांधकाम कामगारांना अधिक संरक्षण मिळेल. असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

---

# १८ वर्षे उलटूनही न्याय नसल्याने आंदोलनाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे** : श्री छत्रपती सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या अंतर्गत पुनर्वसन प्रकल्पाला तब्बल १७-१८ वर्षे उलटूनही न्याय मिळत नसल्याने रहिवाशांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. पुढील सात दिवसांत संयुक्त बैठक आयोजित करून प्रलंबित प्रश्नांवर निर्णय घ्यावा, नाहीतर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या दालनासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला.

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार गृहनिर्माण विभागाने दिलेल्या निर्देशांचे अभियांत्रिकी विभागाकडून कथितपणे पालन न करता प्रकरण दीर्घकाळ



प्रलंबित ठेवल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याच पार्श्वभूमीवर सनय छत्रपती शासन पक्षाचे संस्थापक अध्यक्ष नामदेवराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे मुंबई अध्यक्ष सर्जेराव निकम व मुंबई सरचिटणीस महेश महादेव लाड यांनी संस्थेचे पदाधिकारी अरविंद घाग मुख्य प्रवर्तक व मोहन पांचाळ सह प्रवर्तक एस आर ए चे सचिव शदत्तात्रेय नवले यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

स्थलांतर झाल्यानंतर ३ ते ४ वर्षांत पूर्ण होणे अपेक्षित असलेला पुनर्वसन प्रकल्प आजही रखडलेला असून, रहिवाशांचे पुनर्वसन, कायदेशीर हक्क आणि न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरूच राहणार आहे. संबंधित प्रशासनाने विलंब न करता तातडीने योग्य निर्णय घेऊन प्रलंबित प्रश्न निकाली काढावेत, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

# ओझर पोलिसांची धडक कारवाई: हॉटेल मालकाच्या अपहरण आणि जबरी चोरी प्रकरणातील आरोपी जेरबंद, स्कोडा कार जप्त

**दैनिक युवक आधार**

**ओझर प्रतिनिधी राकेश शर्मा** : निफाड तालुक्यातील कसबे सुकेने येथील हॉटेल व्यवसायिकाचे अपहरण करून जबरी चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला ओझर पोलिसांनी जेरबंद केले आहे. या कारवाईत गुन्ह्यात वापरलेली निळ्या रंगाची स्कोडा कार देखील जप्त करण्यात आली आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 17 जून 2026 रोजी मध्यरात्री कसबे सुकेने येथील हॉटेल मालक प्रवीण मनोहर सोनवने हे हॉटेल बंद करून घरी जात होते. यावेळी निळ्या रंगाच्या कारमधून आलेल्या चार जणांनी त्यांना जबरदस्तीने गाडीत बसवून अपहरण केले. आरोपींनी सोनवने यांच्याकडील 15,000 रुपये रोख, मोबाईल फोन आणि इतर मौल्यवान वस्तू हिसकावून घेतल्या. त्यानंतर त्यांना मारहाण करून दावचवाडी परिसरात नेऊन सोडून दिले. या प्रकरणी ओझर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक डी. एस. स्वामी यांच्या आदेशानुसार या गुन्ह्याचा सखोल तांत्रिक तपास करण्यात आला. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संशयित वाहनाचा माग काढण्यात आला. त्यानंतर दोन दिवस पाळत ठेवल्यानंतर 14 जुलै 2026 रोजी पोलिसांनी सागर रामचंद्र जगताप, राहणार शिवन सोसायटी, मानेनगर, धात्रक फाटा, नाशिक याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपीने आपल्या साथीदारांसह गुन्हा केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेली MH 04 CM 6196 क्रमांकाची निळ्या रंगाची स्कोडा कंपनीची कार जप्त करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक डी. एस. स्वामी, अप्पर पोलीस अधीक्षक विमला एम., उपविभागीय पोलीस अधिकारी संजय बांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली ओझर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महेश कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक रवींद्र खाडे, पोलीस हवालदार दुर्गेश बैरागी, अजय मधने, जितेंद्र बागुल आणि निलेश वाघ यांच्या पथकाने केली.

आरोपीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. गुन्ह्यातील इतर साथीदारांचा शोध घेण्यासाठी पुढील तपास सुरू आहे, अशी माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी संजय बांबळे यांनी दिली.

# तळणी प्राथमिक आरोग्य केंद्र रविवारी कुलूपबंद; आरोग्य सेवेबाबत नागरिकांमध्ये प्रश्नचिन्ह !

**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक महाराष्ट्र -राजु शिंदे** : येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला रविवारी (१२ जुलै) दुपारी ३ वाजता उद्धवसेनेचे तालुका संघटक ज्ञानेश्वर सरकटे यांनी अचानक भेट दिली असता केंद्र कुलूपबंद आढळले. काही वेळानंतर शिपाई नवनाथ सपाटे व सचिन डोंगरे यांनी येऊन केंद्राचे कुलूप उघडले. यावेळी रविवारी नियमित ओपीडी बंद असून आपत्कालीन रुग्ण आल्यास कंत्राटी वैद्यकीय अधिकारी डॉ. पायल खमितकर सेवा देतात, अशी माहिती शिपाई नवनाथ सपाटे यांनी दिली. तसेच आरोग्यसेविका सुनिता राजपूत, ॲम्बुलन्स चालक बंडू चव्हाण, परिचर स्वाती सुरसे व लिपिक अमोल सदावर्ते हे शासकीय निवासस्थानी उपस्थित असल्याचे सचिन डोंगरे यांनी सांगितले.



प्राथमिक आरोग्य केंद्रात सोमवार ते शुक्रवार सकाळी ९ ते दुपारी १ व सायंकाळी ५ ते ६, तर शनिवारी सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत ओपीडी सुरू असते. रविवारी नियमित ओपीडी बंद असते. ओपीडी नोंदवहीनुसार या केंद्रात दररोज सरासरी ३० ते ५० रुग्ण उपचारासाठी येतात. भेटीदरम्यान वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रसन्नजीत वानखेडे अनुपस्थित आढळले. त्यांच्याकडे तळणीसह दहिफळ खंदारे प्राथमिक आरोग्य केंद्राचा अतिरिक्त पदभार आहे. त्यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता प्रतिसाद मिळाला नाही. केंद्रातील पुरुष व महिला स्वच्छतागृहांची स्वच्छता समाधानकारक नसल्याचेही निदर्शनास आले.

या प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉ. प्रसन्नजीत वानखेडे, डॉ. पायल खमितकर, दीपक वाहुळे, उषा घुले, गोपाल सरकटे, सोपान वाघ, सुनिता राजपूत, मनीषा घनसावंत, रंजिता राठोड, सावंत (तात्पुरती नियुक्ती), बंडू चव्हाण, नवनाथ सपाटे, स्वाती सुरसे, आदेश घुले, सचिन डोंगरे व अमोल सदावर्ते कार्यरत आहेत. एक आरोग्य सहाय्यक व एक प्रयोगशाळा तंत्रज्ञ पद रिक्त आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ताप, डेंग्यू, मलेरिया, गॅस्ट्रो, सापदंश, विंचूदंश तसेच भटक्या कुत्र्यांच्या चावण्याच्या घटनांवर उपचारासाठी ॲंटी-स्नेक व्हेनम, ॲंटी-रेबीज लस व इतर जीवनरक्षक औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे पाहणीत दिसून आले.

**पूर्वीच्या भेटींमध्येही गैरहजेरीची नोंद**

यापूर्वी १० जुलै रोजी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. जगन्नाथ कुंडकर यांच्या भेटीदरम्यान सुनिता राजपूत, उषा घुले, सचिन डोंगरे व स्वाती सुरसे हेच कर्मचारी उपस्थित होते, तर इतर कर्मचारी गैरहजर असल्याची नोंद करण्यात आली होती. तसेच २६ जून रोजी डॉ. पायल खमितकर, सुनिता राजपूत व गोपाल सरकटे, तर २४ जून रोजी जिल्हा परिषद जालना येथील अधिकारी एन. जी. पवार यांच्या भेटीदरम्यान सुनिता राजपूत व गोपाल सरकटे गैरहजर असल्याची नोंद भेटवहीत आहे.

**२५ हजार नागरिकांचे आरोग्य केंद्र**

तळणीसह परिसरातील २५ ते ३० गावांतील सुमारे २५ हजार नागरिक या प्राथमिक आरोग्य केंद्रावर अवलंबून आहेत. मात्र डॉक्टर व कर्मचाऱ्यांची अनियमित उपस्थिती, रविवारी कुलूपबंद असलेले केंद्र आणि वारंवार आढळणारी गैरहजेरी यामुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. शासनाने कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून सुसज्ज आरोग्य केंद्र उभारले असतानाही अपेक्षित दर्जाची आरोग्यसेवा मिळत नसल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत. केंद्रात डॉ. प्रसन्नजीत वानखेडे व उषा घुले हे कायमस्वरूपी कर्मचारी असून इतर बहुतांश कर्मचारी कंत्राटी असल्याचे सांगण्यात आले.

# सिल्लोडमध्ये ४२ हजार ३८४ मतदारांचे मॅपिंग प्रलंबित; मनोज मोरेल्लू यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड शहरात सुरू असलेल्या विशेष मतदार यादी पुनरीक्षण (SIR) मोहिमेत प्रशासकीय स्तरावर मोठा हलगर्जीपणा समोर आला आहे. शहरातील एकूण ५५,६३१ मतदारांपैकी तब्बल ४२,३८४ मतदारांचे मॅपिंग अद्याप प्रलंबित असल्याने, अनेक पात्र नागरिक मतदानापासून वंचित राहण्याची भीती भाजप सिल्लोड शहर मंडळाचे अध्यक्ष मनोज मोरेल्लू यांनी व्यक्त केली आहे. यासंदर्भात मोरेल्लू यांनी छत्रपती संभाजीनगरच्या जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन तातडीने कार्यवाहीची मागणी केली आहे.

भाजपच्या प्रमुख मागण्या

सिल्लोड शहरातील प्रलंबित ४२,३८४ मतदारांचे मॅपिंग युद्धपातळीवर तातडीने पूर्ण करण्याचे आदेश द्यावेत.

सर्व बीएलओंना (BLO) निश्चित कालमर्यादा देऊन १०० टक्के काम पूर्ण करण्याचे निर्देश द्यावेत.

कामात हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधित अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांवर नियमानुसार योग्य प्रशासकीय कारवाई करावी.

कोणताही पात्र नागरिक मतदानापासून वंचित राहणार नाही, यासाठी विशेष देखरेख ठेवावी.

संपूर्ण मतदार यादी पुनरीक्षणाची प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष आणि भारत निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार राबवावी.

•प्रशासकीय नियोजनावर प्रश्नचिन्ह•

निवेदनातील अधिकृत माहितीनुसार, ३५,१४० फॉर्मचे वाटप करण्यात आले असून, १३,२४० फॉर्म ऑनलाइन जमा झाले आहेत. मात्र, प्रत्यक्षात केवळ १३,२४७ मतदारांचेच मॅपिंग पूर्ण झाले आहे. कामाचा हा अत्यंत संथ वेग पाहता, पात्र नागरिकांची नावे मतदार यादीतून वगळली जाण्याची किंवा त्यांना मतदानाच्या हक्कापासून वंचित राहावे लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच, काही ठिकाणी मयत व्यक्तींच्या नावे किंवा मतदारसंघ क्षेत्राबाहेरील नागरिकांचे बनावट कागदपत्रांच्या आधारे मॅपिंग होत असल्याच्या तक्रारींचीही सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

"मतदानाचा अधिकार हा प्रत्येक पात्र नागरिकाचा घटनात्मक हक्क आहे. प्रशासनाच्या या संथ गतीमुळे आणि काही ठिकाणी सुरू असलेल्या चुकीच्या पद्धतींमुळे नागरिक आपल्या हक्कापासून वंचित राहू शकतात.

त्यामुळे जिल्हा प्रशासनाने या बाबीची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कार्यवाही करावी," असे भाजप सिल्लोड शहर मंडळाचे अध्यक्ष मनोज मोरेल्लू यांनी म्हटले आहे.

# तांत्रिक अडचणींमुळे 'लाडकी बहीण' योजनेपासून कोणीही वंचित राहू नये; विजय म्हस्के पाटील यांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : राज्य शासनाच्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेली के.वाय.सी. (KYC) प्रक्रिया पूर्ण करताना ग्रामीण व दुर्गम भागातील महिलांना अनेक तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या अडचणींमुळे हजारो पात्र महिला लाभापासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली असून, त्यांना के.वाय.सी. पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ द्यावी आणि विशेष शिबिरे आयोजित करावीत, अशी आग्रही मागणी केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीचे जिल्हाध्यक्ष विजय म्हस्के पाटील यांनी केली आहे.




याबाबत विजय म्हस्के पाटील यांनी राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांना ईमेलद्वारे पत्र पाठवून प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. पत्रात नमूद केल्यानुसार, सिल्लोड तालुक्यासह राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागात इंटरनेटची संथ गती, बँक खात्याशी आधार लिंक नसणे आणि बायोमॅट्रिक मशीनवर अंगठ्याचे ठसे न जुळणे (Biometric issues) अशा तांत्रिक समस्यांमुळे अनेक पात्र महिलांना वेळेत के.वाय.सी. करता आलेले नाही.

अनेक महिला या योजनेसाठी पूर्णतः पात्र असूनही, केवळ तांत्रिक कारणांमुळे लाभापासून वंचित राहण्याच्या भीतीने चिंतेत आहेत. या संवेदनशील विषयाची तातडीने दखल घेऊन, मंत्री आदिती तटकरे यांनी स्थानिक प्रशासन व बँकांना तात्काळ विशेष कॅम्प (शिबिरे) आयोजित करण्याचे निर्देश द्यावेत, जेणेकरून राज्यातील एकही पात्र भगिनी या लाभापासून वंचित राहणार नाही, अशी विनंती म्हस्के पाटील यांनी पत्राद्वारे केली आहे

# शुभम कदम यांचा वाढदिवस शालेय साहित्य वाटप करून साजरा; सामाजिक बांधिलकीचा आदर्श उपक्रम"

**दैनिक युवक आधार**

**देगाव (कुऱ्हाडा) अर्धापूर** : वाढदिवस हा केवळ आनंद साजरा करण्याचा दिवस नसून समाजाप्रती असलेली आपली जबाबदारी जपण्याचीही संधी असते, याचे प्रेरणादायी उदाहरण युवा सामाजिक कार्यकर्ते शुभम गणपती कदम यांनी घालून दिले. त्यांनी आपला वाढदिवस जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, देगाव (कुऱ्हाडा) येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून अत्यंत साधेपणाने व समाजोपयोगी पद्धतीने साजरा केला.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल व इतर आवश्यक शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. या अनोख्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला, तर उपस्थित मान्यवरांनी शुभम कदम यांच्या सामाजिक जाणिवेचे, सेवाभावी वृत्तीचे आणि शिक्षणाप्रती असलेल्या संवेदनशीलतेचे मनापासून कौतुक केले.

वाढदिवसानिमित्त केक, फटाके व अनावश्यक खर्च टाळून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांसाठी हातभार लावण्याचा त्यांचा निर्णय समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. अशा सामाजिक उपक्रमांमुळे युवकांमध्ये सेवाभाव आणि सामाजिक उत्तरदायित्वाची भावना अधिक दृढ होत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

यावेळी माजी सरपंच तथा संभाजी ब्रिगेड नांदेड जिल्हाध्यक्ष भगवान कदम, ग्रामपंचायत सदस्य संजय कदम, माजी उपसरपंच विश्वंभर कदम, तंटामुक्ती अध्यक्ष गंगाधर कदम, पोलीस पाटील दत्तात्रय चिंचडवाड, शाळेचे मुख्याध्यापक अनुरथ कसबे, ज्ञानोबा कदम, नरोजी कदम, काशिनाथ कदम, शामराव कदम, गजानन कदम, संजय कदम तसेच मित्रपरिवारातील अभिषेक कदम, संतोष कदम, ओंकार कदम, मारुती कदम, कृष्णा कदम, अंगद कदम, आशिष कदम, धीरज कदम, समीर शेख, विठ्ठल कदम, अजय शिंदे, अनिल दिवशे, अनिकेत आढाव, संतोष आढाव, नवनाथ आढाव, लिंगोजी कदम, गणेश कदम, गजानन पांचाळ आणि संकेत कदम यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक, शाळेचे शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थितांनी शुभम गणपती कदम यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव केला. वाढदिवसासारखे वैयक्तिक आनंदाचे क्षण समाजोपयोगी उपक्रमांद्वारे साजरे करून इतर युवकांसमोर आदर्श निर्माण करणारे शुभम कदम यांचे कार्य निश्चितच अनुकरणीय असल्याची भावना यावेळी सर्वांनी व्यक्त केली.





# लासलगाव हादरले! ॲक्सिस बँकेच्या खात्यातून २५ लाखांची सायबर लूट; खातेदार पोलिसांच्या जाळ्यात




**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी** : लासलगाव येथील ॲक्सिस बँकेच्या शाखेतील एका खात्याचा वापर करून तब्बल २४ लाख ९० हजार रुपयांची सायबर फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, संबंधित खातेदाराविरोधात सायबर पोलीस ठाणे, नाशिक ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सायबर पोलीस ठाण्यात कार्यरत महिला पोलीस शिपाई मेघा निलेश कातकाडे यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, दि. २० जानेवारी २०२६ रोजी आरोपीने विविध तक्रारदारांना आमिष दाखवून व फसवणूक करून त्यांच्याकडील रक्कम लासलगाव येथील ॲक्सिस बँकेतील स्वतःच्या खात्यात जमा करून घेतली. त्यानंतर ही रक्कम धनादेशाद्वारे स्वतःच्या किंवा साथीदारांच्या आर्थिक फायद्यासाठी काढून घेत तब्बल २४.९० लाख रुपयांचा गंडा घातल्याचे समोर आले आहे.

या गंभीर प्रकरणी दि. १४ जुलै २०२६ रोजी गुन्हा र. नं. १५/२०२६ दाखल करण्यात आला असून, आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३१९(२), ३(५) तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(सी) व ६६(डी) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सायबर फसवणुकीचे धागेदोरे लासलगावपर्यंत पोहोचल्याने परिसरात खळबळ उडाली असून, या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा कसून तपास पोलीस निरीक्षक नागेश मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस करीत आहेत.



# किंगकाँगशी प्रत्यक्ष भेट

किंगकाँगच्या पडद्यावरील प्रतिमेपासून ते रवांडाच्या जंगलातील प्रत्यक्ष भेटीपर्यंतचा पर्वतीय गोरिलाचा प्रवास थक्क करणारा आहे. विरुंगा पर्वतरांगांमध्ये केलेल्या ट्रेकमध्ये या दुर्मीळ आणि शांत जीवांच्या जगाचा जवळून घेतलेला हा अनुभव.

आमच्या लहानग्या वयात आम्ही किंगकाँग सिनेमात आठ फुटांचा गोरीला पाहिला होता. दोन पायांवर चालत, वळलेल्या मुठींनी छाती बडवत तो गर्जना करायचा. लहानपणी मनात ठसलेली ही प्रतिमा त्या महाकाय गोरिलाला प्रत्यक्ष पाहिलं तेव्हा उजळून निघाली. रवांडा या देशातून हा गोरिला ट्रेक केला तेव्हा त्याच्याबद्दल खूप वेगळी आणि मौलिक माहिती मिळाली होती.

पर्वतीय गोरिला हा मर्कट जातीतला एक अनोखा प्राणी! जगभरात फक्त हजाराच्या आसपास उरलेल्या या प्राण्यांचं वास्तव्य पूर्व आफ्रिकेतील उत्तर रवांडा, युगांडा आणि कांगो या तीन देशांच्या सीमाप्रदेशात असून त्यातील जवळ जवळ अर्धे गोरिला रवांडा येथील 'वोल्कॅनो नॅशनल पार्क'मध्ये आढळतात. तिथे जाऊन विरुंग नावाचा पर्वत चढून, बांबूच्या वनात विसावलेल्या या गोरिलाच्या कुटुंबाला पाहणं हा एक मुलखावेगळा अनुभव आहे.

या प्रवासाची तयारी मात्र खूप आधीपासून करावी लागते. गोरिलाभेटीचे परवाने मर्यादित संख्येत असल्यामुळे त्याची शाश्वती असल्याशिवाय प्रवासास निघूच नये. हे परवाने रवांडा डेव्हलपमेंट बोर्डाकडून दिले जातात. रवांडातील ट्रॅव्हल एजंटही ते तुमच्यासाठी उपलब्ध करून देऊ शकतात. हे सगळे सोपस्कार वेळेआधीच आटोपून आणि तनमनाला या भेटीसाठी तयार करून आम्ही रवांडा गाठलं. वोल्कॅनो नॅशनल पार्क हे एक मोठं जंगलच आहे. गोरिलांची आठ कुटुंबं तिथे वास्तव्यास आहेत. पैकी पाच कुटुंबांना पर्यटक भेट देऊ शकतात. बाकी तीन कुटुंब संशोधनासाठी राखीव आहेत. प्रत्येक कुटुंबाची संख्या वेगळी. काही अगदी पर्वताच्या शिखराशी वास्तव्य करून आहेत तर काही मध्यावर. त्यामुळे त्यांच्यापर्यंत पोहोचायचा मार्ग हा कमी-अधिक अंतराप्रमाणे सुकर वा दुर्गम होत जातो. गोरिलांच्या 'उमुबानो' कुटुंबाला भेट देण्यासाठी आम्हाला तब्बल अडीच तासांचा दमछाक करणारा ट्रेक करावा लागला. नॅशनल पार्कच्या पर्यटन केंद्रातून आपल्याला एक निष्णात रेंजर गाइड दिला जातो. आपल्या पेशात पदवीधर आणि निपुण अशा या गाइडवरच आपली सारी भिस्त असते. प्रत्येक ग्रुपमध्ये फक्त आठ जण असतात, याचा अर्थ दर दिवशी फक्त चाळीस पर्यटक गोरिला भेटीला जाऊ शकतात. माणसांच्या सान्निध्यामुळे गोरिलाला जंतुसंसर्ग होण्याची शक्यता असल्यामुळे ही दक्षता घेतली जाते.

टेकडी चढायला सुरुवात केली तेव्हा वाट धुक्यात हरवली होती. गुलाबी गारवा होता. मात्र जसजशी उंची गाठत गेलो तसतसे घामाने भिजलेले कपडे पाठीवरच्या बॅगेत कोंबायला सुरुवात केली. भुसभुशीत जमिनीचा अंदाज घेत, काठ्यांवर भार देत, झाडांच्या बुंध्यांवरून लोंबकळत, लोंबत्या वेलींचा गुंता सोडवत, कधी मोकळ्या तर कधी घनदाट जंगलातून आमची चढउतार चालू होती. आमचा गाइड वाटेतील वृक्षवल्लींबद्दल, वनचरांबद्दल उपयुक्त माहिती पुरवत होता. गोरिला तर त्याचा अभ्यासाचा आणि जिव्हाळ्याचा विषय! त्याने प्रथम गोरिलांसमोर वावरताना काय काय काळजी घ्यायची ते सांगितलं आणि त्याही आधी काय करायचं नाही हे अतिशय विनोदी पद्धतीनं सांगितलं.

खास या भेटीसाठी लांबलांबून आलेल्या उत्सुक पर्यटकांना तो कळकळीची विनंती करत होता की तुम्ही या शांत प्राण्याला अजिबात घाबरू नका. त्यांच्या नैसर्गिक निवासात त्यांना पाहायचा पुरेपूर आनंद लुटा. पर्वतीय गोरिला हा खरं तर शांतताप्रिय, कुटुंबवत्सल आणि अनाक्रमक स्वभावाचा प्राणी. मात्र त्याच्या परिवाराच्या सुरक्षिततेला धोका असल्याची नुसती शंका जरी त्याला आली तरी तो चवताळून 'मी काय करू शकतो' याची एक झलक दाखवतो. म्हणूनच त्याच्यात आणि तुमच्यात सात मीटरचं सुरक्षित अंतर हवं. या त्याच्या कानमंत्राला विनोदी टिपण्णी जोडत तो पुढे म्हणाला, पण हा नियम गोरिलाला लागू नाही. हे त्याचं घर आहे. स्वागतासाठी जर तो पुढे आला तर घाबरून पळू नका; मात्र स्वतःहून त्याच्या मार्गात आडवे जाऊ नका. त्याची वाट सोडा. सिनेमातील किंगकाँग माणसं खायचा; परंतु प्रत्यक्षात गोरिला हे पाला खाणारे शाकाहारी जीव आहेत आणि काही आणीबाणी उद्भवली तर 'मैं हूँ ना!'

हो आणि म्हणे गोरिलासमोर शिंकायचं नाही. का बुवा? हा एवढा अगडबंब प्राणी माणसाच्या शिंकेला घाबरतो की काय? की लाल फडकं दाखवलं की 'घेतलं शिंगावर' करत चाल करून येणाऱ्या बैलासारखा पिसाळतो? आणि नेमकी त्याचवेळी शिंक आली तर? ती काय कुणाच्या हातात आहे? अशा अनेक 'शिंका'-कुशंकांचं निरसन त्याने एका वाक्यात केलं. "मनुष्यापासून होणारा जंतुसंसर्ग गोरिलांसाठी घातक असल्यामुळे शिंक द्यायचीच झाली तर ती चेहरा फिरवून रुमालात द्यावी."

गोरिलाला म्हटलं, "बरं बाबा, नाही जाणार तुझ्या वाटेला आणि नेमकी माशी शिंकली म्हणायची संधीही नाही देणार."

मजल दरमजल करत आम्ही गोरिलांच्या कबिल्याजवळील जागेवर पोहोचलो. गाइडनं सांगितल्याप्रमाणे बांबूचं वन दिसू लागलं होतं. आता कुठल्याही क्षणी गोरिलाचं प्रथम दर्शन होण्याची शक्यता दाट झाली. "हे कुटुंब नेहमी एकाच जागेवर वस्ती करून राहतं का?" या माझ्या प्रश्नाला मला अतिशय आश्चर्यकारक उत्तर मिळालं. गोरिलांना म्हणे रोज रात्री घरासाठी नवी जागा लागते. 'कशासाठी? पोटासाठी!' करत करत ही मंडळी दिवसभरात चाळीस चौरस किमी इतकं अंतर तुडवतात. त्यांचं आवडतं खाद्य आहे नेटल नावाची काटेरी वनस्पती आणि बांबूचे कोवळे कोंब. बांबू खाताना तो हातात धरून त्याची टणक व कडवट साल दातांच्या सहाय्यानं सोलून आतला फक्त कोवळा कोंबच ते मटकावतात. मानव उत्क्रांतीकडे अग्रेसर हे त्यांचं पहिलं पाऊल असावं. सत्तर प्रकारच्या वनस्पती आणि कंदमुळं खाणारे गोरिला पाणी पीत नाहीत. वाहत्या पाण्याला ते घाबरतात. त्यांना पावसाचंही वावडं आहे. मुळापासून उन्मळून पडलेलं, पाण्याचा भरपूर अंश असलेलं झाडाचं कुजलेलं खोड चघळून किंवा पाणी साठवणाऱ्या वनस्पती खाऊन ते आपली पाण्याची तहान भागवतात. तहान-भूक करत दिवसभर अशी पायपीट झाली की संध्याकाळी बांबूच्या बनातली सपाटशी जागा बघून, पालापाचोळ्यांची शय्या बनवून हे कुटुंब निद्राधीन होतं. दुपारच्या वामकुक्षीसाठीही असाच एखादा निवारा मिळाला की ते लगेच आडवे होतात. संशोधक मंडळींच्या अभ्यासात ही त्यांची घरकुलं फार महत्त्वाची ठरतात. त्यांचा आकार, संख्या व घराबाहेरील विष्ठेचा अभ्यास करून गोरिलांच्या वयाचा अंदाज लावला जातो.

उत्साह आणि उत्सुकतेने आम्ही पाचच मिनिटं चाललो असू नसू, आम्हाला पहिल्या गोरिलाचं दर्शन घडलं. अकराचा सुमार असावा, भरपेट नाश्ता करून स्वारी मस्त लोळत पडली होती. गाइडने परवलीचे शब्द वापरून त्याला जागं केलं. बहुदा 'अरे काय रे? आत्ता कुठे आडवा झालो होतो' अशी गुरकावणी करत, डोळे किलकिले करून त्याने आमच्याकडे पाहिलं आणि अंग झटकून आमच्यासमोर फतकल मारून बसला. गोरिलांची भाषा गाइडला अवगत होती. महाराज कधी रागवलेत, कधी वैतागलेत आणि कधी आनंदात आहेत हे सगळं त्याच्या रेकण्यातून, गुरकावण्यातून आणि गर्जनांमधून व्यक्त होतं. अशा भावना दाखवणारे पंचवीस आवाज अभ्यासकांनी शोधून त्याची नोंद करून ठेवली आहे.

जवळून घेतलेलं ते गोरिलाचं प्रथम दर्शन होतं. चकचकीत गोट्यांसारखे पिंगट रंगाचे भावपूर्ण डोळे, फेंदारलेलं वाटावं असं थोडं वर उचललेलं नाक, केसाळ काया, हातापायाचे पंजे अगदी मनुष्यासारखे, नखंही तशीच. हस्तरेखाही स्पष्टपणे दिसत होत्या. गोरिलाने जवळच पडलेली नेटलची कांडी उचलली आणि निर्विकारपणे ती खाऊ लागला. नेटल ही एक काटेरी वनस्पती आहे. जंगलातून चालताना तिचा स्पर्श जरी झाला तरी मेंदूत झिणझिण्या जातात. विंचवाच्या डंखाएवढा वेदनादायी स्पर्श असतो तो. कातडीवर पित्तासारख्या लाल गांध्या येतात आणि त्याची प्रचंड आग होते. त्या आगीला शांत करणारी दुसरी एक वनस्पती तिथेच उपलब्ध आहे. लांब बाह्यांचे शर्ट घातले होते तरी या नेटलने आम्हाला एक दोनदा आपला हिसका दाखवला. अशी ही खतरनाक वनस्पती हातांनी सोलून हा पठ्ठ्या खात होता. त्याच्या अंगावरील जाड केसाळ कातडीपुढे हे नेटलच नांगी टाकत असावेत. पर्वतीय गोरिलांची कातडी ही त्यांच्या इतर भाईबंदांपेक्षा अधिक जाड व राठ असते.

बहुदा थंडीपासून बचाव म्हणून ती ईश्वराने बहाल केली असावी. पहिला गोरिला नजरेस पडला तेव्हा गाइडनं आपलं घड्याळ सेट केलं. त्या सेकंदापासून पुढे एक तास आम्हाला गोरिलांच्या सान्निध्यात मिळणार होता. एकसष्टाव्या मिनिटाला त्यांचा निरोप घ्यायचा होता. तो निरोप घेणं इतकं जड जाईल असं स्वप्नातही वाटलं नव्हतं मला.

**मेधा आलकरी**
**लेखिका आणि ट्रॅव्हलर**

## विठूरायाच्या वारीत महिलांच्या डोक्यावर तुळस असण्यामागचं कारण काय?

विठू नामाचा गजर, टाळ-मृदंगाचा नाद आणि डोक्यावर तुळशीचे रोप घेऊन चालणाऱ्या महिला वारकरी... पंढरीच्या वारीतील हे दृश्य महाराष्ट्राच्या समृद्ध संस्कृतीचे दर्शन घडवते. या वारीत डोईवर तुळशीवृंदावन घेतलेल्या महिला चालताना मुखाने 'माऊली माऊली' देखील म्हणतात. वारीचा प्रवास हा लांबचा असतो. या संपूर्ण प्रवासात तुळशी वृंदावनाचा संपूर्ण भार डोक्यावर घेऊन वारकरी महिला चालत असतात. परंतु, त्यांच्या चेहऱ्यावर याचा कसुभरही थकवा दिसत नाही. पण तुम्ही कधी विचार केला आहे का, की वारीत महिलांनी डोक्यावर तुळस घेण्याची ही परंपरा कधी आणि का सुरू झाली? यामागे केवळ विठ्ठलाप्रती असलेली भक्ती आहे की काही वैज्ञानिक कारण? चला जाणून घेऊयात यामागील उत्तर.

**धार्मिक कारण**

तुळस भगवान विष्णूंना प्रिय आहे. विष्णूंच्या पूजेत तुळस




अर्पण केली जाते. तर पंढरीचा विठ्ठल हे विष्णूंचे रुप आहे, त्यामुळे तुळस जशी विष्णूंना प्रिय आहे तशीच विठूरायाला प्रिय आहे, अशी समज आहे.

**वैज्ञानिक कारण**

तुळस प्राणवायू देते आणि कार्बन डायऑक्साइड शोषते. त्यामुळे डोक्यावर जेव्हा तुळस घेतली जाते तेव्हा प्रत्येक महिला 20 ते 25 फुटांपर्यंतच्या हवेत ऑक्सिजनची पातळी संतुलित ठेवते. परिणामी सर्वांना शुद्ध हवा मिळते. याशिवाय तुळशीत ॲंटीबॅक्टेरियल आणि ॲंटीव्हायरल गुण असतात. या गुणांमुळे हवेतील बॅक्टेरिया कमी होतात आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढते. या सर्वांमुळे वारीत चालणाऱ्या वारकऱ्यांचे आरोग्य उत्तम राहते. म्हणूनच की काय वर्षोनुवर्षे डोक्यावर तुळस घेऊन चालायची परंपरा आपल्याकडे आजही जपली जाते.

## पनीर आवडतं पण खाताच पोट 'टम्म' फुगते, गॅस होतो, पण का? पोटफुगीचे नक्की कारण काय?

पनीर हा प्रथिने आणि कॅल्शियमचा एक उत्तम स्रोत मानला जातो. अनेक लोकांना पनीर प्रचंड आवडते पण काहींना ते खाल्ल्यानंतर पोटात जडपणा जाणवतो, गॅस आणि पोटफुगी होते. त्यामुळे ते पोटफुगी होण्याच्या भीतीने पनीर खाणेच बंद करतात. गॅस्ट्रोएंटेरोलॉजिस्ट आणि डायटिशियन कनिका मल्होत्रा यांच्या मते, पनीर हा प्रोटीनचा उत्तम स्रोत आहे. शाकाहारी लोक खास करून हे पदार्थ खाण्यास पसंती देतात. न्यूट्रिशन तज्ज्ञांच्यामते, पनीर खाल्ल्यास तुम्हाला पोटफुगी होत असेल तर समस्या पनीर नाही तर तुम्ही ते कशाबरोबर खाता आणि कधी खाता ही असू शकते.

सर्टिफाइड न्यूट्रिशनिस्ट आयना सिंघल यांच्यामते, पनीर जर जास्त कर्बोदके, गोड सॉस किंवा उशिरा पचण्यास जड जेवणाबरोबर खाल्ले तर त्यामुळे पचनासंबंधी समस्या निर्माण होऊ शकतात. जसे की, पोटफुगी, पोटात जडपणा जाणवणे तर काहींना त्वचेसंबंधी समस्या निर्माण होऊ शकतात. आता प्रश्न असा आहे की कोणत्या पदार्थांबरोबर पनीर एकत्र खाल्ल्यास पोटफुगी किंवा गॅसची समस्या होते. तज्ज्ञांच्या मते पोटफुगी आणि गॅसपासून वाचण्यासाठी पनीरचे सेवन कसे करावे हे समजून घ्या.

**काही पदार्थांबरोबर पनीरचे सेवन केल्याने खरंच पोटफुगी होते का?**

आयना सिंघल यांच्यामते, पनीरबरोबर काही पदार्थ खाल्ल्यास अन्न पचण्याचा वेग मंदावतो. म्हणून काही पदार्थांबरोबर पनीर खाणे टाळावे. तज्ज्ञांच्या मते, पनीरबरोबर एकावेळी चपाती किंवा भात दोन्हीपैकी एकच पर्याय निवडावा कारण एकाच वेळी भात-पोळीसह पनीर खाल्ले तर पोटफुगी होऊ शकते. पनीरबरोबर राजमा, छोले किंवा डाळींचे अधिक सेवन केल्यास पोटफुगी होते. पनीरसह गोड सॉस किंवा गोड पदार्थ खाल्ल्यास पचनक्रियेत बिघाड होऊ शकतो. पनीर आणि दुग्धजन्य पदार्थ एकत्र खाल्ल्यास देखील गॅस आणि पोटफुगी होऊ शकते. अशा पदार्थांमुळे पोट फुगते, जडपणा जाणवतो.

**पनीरबरोबर काही पदार्थ खाल्ल्याने खरंच आरोग्याचे नुकसान होते का?**

कनिका मल्होत्रा यांच्यामते, फूड कॉम्बिनेशन थेअरी ज्यामध्ये प्रोटीन, कार्बोहायड्रेट किंवा दूध आणि फळांसह एकत्र खाऊ नये. याबाबत वैज्ञानिक पुरावा नाही. तज्ज्ञांच्या मते आपली पचनक्रिया एकाचवेळी प्रथिने, चरबी आणि कर्बोदके यांना पचवणारे एंझाइम्स तयार करते. त्यामुळे पनीर इतर पदार्थांसोबत खाणे आरोग्यासाठी धोकादायक आहे हे म्हणणे योग्य नाही, कारण याला कोणताही वैज्ञानिक पुरावा नाही.

**पनीर खाल्ल्यानंतर पोटफुगी का होते?**

ही लोकांना पनीर खाल्ल्याने पोटफुगी होत असेल, तर त्याला पनीर कारणीभूत नसून त्यांची वैद्यकीय स्थिती जबाबदार असू शकते. कनिका मल्होत्रा यांच्या मते, पनीरमध्ये कॅसीन नावाचे प्रोटीन असते जे हळू हळू पचते. जर पनीर राजमा, छोले आणि उच्च फॉडमॅप [FODMAP म्हणजे काही विशिष्ट कर्बोदके (Carbohydrates) आणि साखरेचे प्रकार, जे पचनसंस्थेला सहज पचवता येत नाही] किंवा खूप जास्त रिफाइंड कार्बोहायड्रेटसह खाल्लास, ज्या लोकांना इरिटेबल बॉवेल सिंड्रोम, SIBOची समस्या आहे [(Small Intestinal Bacterial Overgrowth) म्हणजे लहान आतड्यात बॅक्टेरियाची (जीवाणूंची) अवाजवी वाढ होणे] किंवा आधीपासून पचनासंबंधित समस्या आहे त्यांना गॅस किंवा ब्लोटिंगची समस्या वाढू शकते. या शिवाय कित्येक भारतीयांना लॅक्टोज इंटॉलरन्स (Lactose Intolerance) देखील असतो, ज्यामुळे पनीर खाल्ल्यानंतर होणारा त्रासाला अनेकदा लोक चुकीचे पदार्थांबरोबर खाल्ल्याने होत आहे असे समजतात.

**पनीर खाल्ल्याने वजन वाढते का?**

डॉक्टर कनिका मल्होत्रा यांच्या मते पनीर खाल्ल्याने वजन वाढते हे चुकीचे आहे. वजन वाढण्याचे मुख्य कारण पनीर नसून त्यासोबत खाल्ले जाणारे इतर पदार्थ, एकूण कॅलरीज आणि 'पोर्शन साईज' (खाण्याचे प्रमाण) हे असते. जर पनीर बटर आणि क्रीम किंवा तुपातील पचण्यास जड ग्रेव्हीमध्ये बनवले किंवा जास्त प्रमाणात खाल्ले तर त्यामुळे कॅलरी वाढते आणि वजन वाढण्याचा धोका वाढू शकतो.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ : कर्जमुक्ती आता अधिक व्यापक

शेतकरीराजा आणि कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने सर्वात मोठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६' जाहीर करुन शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याचा ऐतिहासिक असा निर्णय घेतला आहे. या योजनेची व्यापकता वाढवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पात्र शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार असल्याची घोषणा केली आहे याविषयी ही माहिती...

शेतकरीबांधवांना सन्मानाने राजा म्हणून संबोधले जाते. तो जगाचा पोशिंदा आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेचा तो एक महत्त्वाचा कणा आहे. अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी व महापूर यांसारख्या नैसर्गिक संकटांमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तसेच त्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होऊन कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने सर्वात मोठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६' जाहीर करुन शेतकरी बांधवांना कर्जमुक्ती देण्याचा ऐतिहासिक असा महानिर्णय घेतला आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक कुशल प्रशासक, रयतेच्या कल्याणासाठी आयुष्य वेचणाऱ्या लोकाभिमुख शासक होत्या. शेती, सिंचन, जलसंधारण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला त्यांनी दिलेले प्रोत्साहन आजही आदर्श मानले जाते. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना न्याय देण्याची त्यांची भूमिका होती. म्हणूनच त्यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षात शेतकरी कल्याणाशी निगडित या महत्त्वपूर्ण योजनेस "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना" हे नाव देऊन शासनाने



त्यांच्या कार्याला अभिवादन केले आहे.

शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी राज्य शासनाने यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७, महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ आणि महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना २०२२ जाहीर करुन शेतकऱ्यांना वेळोवेळी भरीव मदत केली आहे.

राज्यातील शेतकरी कर्जमुक्तीनंतरही थकीत कर्जाच्या दुष्टचक्रामध्ये अडकत असल्याचे दिसून येते. शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून कायमस्वरुपी सोडवणूक करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता म्हणून यादृष्टीने शिफारशी करण्यासाठी मुख्यमंत्री यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (मित्र) प्रविण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती गठीत केली होती.

या समितीने शेतकऱ्यांना कर्जमुक्तीची आवश्यकता, शेतकऱ्यांवर वारंवार कर्जमाफीची वेळ का येते? त्यांच्या उत्पन्नात स्थैर्य का निर्माण होत नाही? भविष्यात शेतकरी पुन्हा कर्जाच्या चक्रात अडकू नयेत, शेतकरी सक्षम व्हावा याबाबत अल्पकालीन आणि दीर्घकालीन अशा दोन्ही प्रकारच्या उपाययोजना सुचविलेल्या आहेत. मात्र तातडीचा दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ देणारी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' ही ऐतिहासिक योजना असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले. अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना त्यांनी महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत ५० हजार रुपयांचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर योजनेमध्ये ५० हजार रुपयांचा लाभ देण्याची मर्यादा काढून टाकण्यात आली आहे, अशा शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. तसेच नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी २०२६-२७ मध्ये कर्जाची उचल करून वेळेत परतफेड करण्याची अट रद्द करण्याची घोषणा केली आहे.

राष्ट्रीयकृत, व्यापारी, खासगी आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडील माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ मिळणार आहे. पूर्वीच्या योजनेत दोन लाख रुपयांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळत नव्हता. मात्र, नव्या योजनेत दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असली तरी दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी दिली जाणार आहे.

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील पात्र शेतकऱ्यांसाठी दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीसाठी असलेली ५० हजार रुपयांची मर्यादा आणि २०२६-२७ मधील नियमित परतफेडीची अट रद्द करण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडणार असला तरी कोणताही पात्र शेतकरी वंचित राहू नये, ही शासनाची भूमिका आहे.

कृषी क्षेत्रासाठी राज्य शासन दरवर्षी सुमारे ९५ हजार कोटी रुपयांचा खर्च करीत असल्याचे सांगताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांच्या वीजबिलासाठी २५ हजार कोटी रुपये खर्च केले जातात. कापसाची १३६ लाख क्विंटल खरेदी करून १० हजार ८८३ कोटी रुपयांचे चुकारे अदा करण्यात आले आहेत. सोयाबीनचे ६ लाख टन उत्पादन ३ हजार १९८ कोटी रुपयांना खरेदी करण्यात आले, तर कांदा खरेदीमुळे बाजारभाव स्थिर राहण्यास मदत झाली आहे. ठिबक सिंचनासाठी प्रलंबित २१७ कोटी रुपये लवकरच वितरित करण्यात येतील, तसेच कृषी समृद्धी योजनेतील उर्वरित निधी पुरवणी मागण्यांतून उपलब्ध करून दिला जाईल.

महाराष्ट्राच्या इतिहासातील ही सर्वात मोठी कर्जमुक्ती योजना ठरणार असून केवळ कर्जमाफी नाहीतर शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे त्यांचा आत्मविश्वास वाढवणे आणि शेती क्षेत्राला नवसंजीवनी देण्याचा उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न या योजनेच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

**– विभागीय माहिती कार्यालय, अमरावती**